। लातूर । वर्ष ३४ वे । अंक १८६ वा । मंगळवार, दिनांक १४ ऑक्टोबर २०२५ । पृष्ठे ६ । किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

# यंदा विद्यार्थ्यांची लवकरच कसोटी



## १० वी अन् १२ वी बोर्ड परीक्षांच्या तारखा जाहीर

## बारावी बोर्ड परीक्षा १० फेब्रुवारी २०२६ ते १८ मार्च २०२६ या कालावधीत

## दहावी बोर्ड परीक्षा २० फेब्रुवारी २०२६ ते १८ मार्च २०२६ या कालावधीत

**पुणे/प्रतिनिधी :** एकीकडे निवडणुकांची रणधुमाळी सुरू असताना दुसरीकडे दहावी (SSC) आणि बारावी बोर्डाच्या (HSC) परीक्षांच्या तारखा जाहीर करण्यात आल्या आहेत. बारावी बोर्ड परीक्षा १० फेब्रुवारी २०२६ ते १८ मार्च २०२६ या कालावधीत संपन्न होणार आहे. तर दहावी बोर्ड परीक्षा २० फेब्रुवारी २०२६ ते १८ मार्च २०२६ या कालावधीत होणार आहे. यंदाच्या वर्षी सुद्धा दहावी आणि बारावी बोर्डाच्या परीक्षा दोन आठवडे आधी घेण्याचा निर्णय शिक्षण मंडळाने घेतला आहे. कारण, १२ वी बोर्ड परीक्षा ही फ्रेब्रुवारी महिन्यात शेवटच्या आठवड्यात असते, तर दहावीची परीक्षा ही मार्च महिन्यात सुरू असते. मात्र, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत (झींपश) घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र १२ वी आणि माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र १० वीच्या फेब्रु-मार्च २०२६ च्या परीक्षांच्या तारखांबाबत शासनाने परिपत्रक जारी केलं असून परीक्षा लवकर होत आहेत.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने पुणे, नागपूर, छ. संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत आगामी फेब्रुवारी-मार्च २०२६ मधील उच्च माध्यमिक प्रमाणपत्र १२ वी आणि माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र १० वी परीक्षेच्या लेखी, प्रात्यक्षिक व इतर परीक्षा तारखांना आयोजित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार, १२ वीची लेखी परीक्षा मंगळवार १० फेब्रुवारी २०२६ ते बुधवार १८ मार्च २०२६ (माहिती तंत्रज्ञान व सामान्यज्ञान विषयांच्या ऑनलाईन परीक्षेसह) होणार आहे. तर, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र १० वीची परीक्षा कालावधी शुकवार २० फेब्रुवारी २०२६ ते बुधवार १८ मार्च २०२६ रोजी घेण्यात येणार आहेतच.

दरम्यान. शासनाच्या परिपत्रकानुसार १२ वी बोर्डाच्या प्रात्यक्षिक श्रेणी तोंडी व अंतर्गत मूल्यमापन तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रात्यक्षिक परीक्षा या २३ जानेवारी २०२६ ते ९ फेब्रुवारी २०२६ दरम्यान होणार आहेत. तर दहावी बोर्डाच्या प्रात्यक्षिक श्रेणी व अंतर्गत मूल्यमापन तसेच अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम प्रात्यक्षिक परीक्षा २ फेब्रुवारी ते १८ फेब्रुवारी दरम्यान होणार आहेत.

**तोंडी अन् प्रॅक्टीकल परीक्षेचीही तारीख जाहीर** (Practicle exam ssc)

प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन तसेच NSQF अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम प्रात्यक्षिक परीक्षाशुकवार २३ जानेवारी २०२६ ते सोमवार ०९ फेब्रुवारी २०२६ रोजी (माहिती तंत्रज्ञान व सामान्यज्ञान विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षेसह) सोमवार ०२ फेब्रुवारी २०२६ ते बुधवार १८ फेब्रुवारी २०२६ (शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षेसह) शाळा/ कनिष्ठ महाविद्यालय व विद्यार्थी यांना अभ्यासक्रमाचे नियोजन करण्याचे हेतूने तसेच विद्यार्थ्यांच्या मनावरील ताण कमी होण्याचे दृष्टीने फेब्रुवारी-मार्च २०२६ परीक्षेच्या प्रात्यक्षिक व लेखी परीक्षेच्या तारखा जाहीर करण्यात आल्या आहेत. उपरोक्त परीक्षांचे विषयनिहाय सविस्तर अंतिम वेळापत्रक स्वतंत्रपणे मंडळाच्या संकेतस्थळावर यथावकाश जाहीर करण्यात येईल, असेही सांगण्यात आले आहे. महामंडळाचे सहसचिव प्रमोद गोफणे यांच्या सहीने याबाबतचे परिपत्रक जारी करण्यात आले आहे.

## नक्षल चळवळीला सर्वोच्च धक्का!; वरिष्ठ नेता भूपतीची ६० सहकाऱ्यांसह गडचिरोली पोलिसांसमोर शरणागती



**गडचिरोली/प्रतिनिधी :** दीर्घकाळ नक्षल चळवळीत सक्रिय राहून पॉलिट ब्युरो आणि केंद्रीय समितीपर्यंत पोहोचलेल्या वरिष्ठ नक्षलवादी नेता मल्लोजुला वेणुगोपाल उर्फ भूपती उर्फ सोनू याने अखेर आपल्या ६० सहकाऱ्यांसह गडचिरोली पोलिसांसमोर आत्मसमर्पण केल्याची माहिति समोर आली आहे. त्याच्यावर विविध राज्यात मिळून दहा कोटीहून अधिक बक्षीस होते. १६ तारखेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर तो शस्त्र खाली ठेवणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.


भूपती हा नक्षलवादी संघटनेचा प्रभावशाली रणनीतिकार मानला जातो. तो अनेक वर्षे महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेवरील प्लाटूनचा मार्गदर्शक म्हणून कार्यरत होता. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून त्याच्यात आणि संघटनेच्या शीर्ष नेतृत्वात मतभेद वाढले होते. भूपतीने 'सशस्त्र संघर्ष ' निष्फळ ठरल्याचे मान्य करून शस्त्रसंधीचा मार्ग स्वीकारण्याचे आवाहन केले होते. जनाधार घटला, शेकडो सहकाऱ्यांचा मृत्यू झाला त्यामुळे संघर्ष नव्हे तर संवादच पर्याय आहे, असे त्याने एका पत्रकात म्हटले होते.

त्याच्या या भूमिकेला काही नक्षल नेत्यांनी विरोध केला. त्यांनी संघटनेचा महासचिव थिप्पारी तिरुपती उर्फ देवजी याच्या नेतृत्वाखाली लढा सुरू ठेवण्याची भूमिका घेतली होती. मात्र, केंद्रीय समितीने भूपतीवर दबाव आणून शस्त्र खाली ठेवण्याचे आदेश दिले. यानंतर त्याने संघटनेतून बाहेर पडत असल्याची घोषणा केली आणि अखेर आपल्या साठ सहकाऱ्यांसह गडचिरोली पोलिसांसमोर आत्मसमर्पण केले.

## कॉ. गोविंद पानसरे हत्या प्रकरणातील १२ पैकी बहुतांश संशयितांना जामीन !

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** येथील कॉम्रेड गोविंद पानसरे हत्या प्रकरणासंदर्भात मोठी बातमी समोर आली आहे. यातील संशयित डॉ. वीरेंद्रसिंह तावडे, अमोल काळे आणि शरद कळसकर यांना कोल्हापूर येथील मुंबई उच्च न्यायालयाच्या सर्किट बेंचकडून जामीन मंजूर झालाय. कॉम्रेड गोविंद पानसरे हत्या प्रकरणी आजपर्यंत एकूण १२ संशयित आरोपींना अटक करण्यात आली होती. त्यापैकी ९ जणांना यापूर्वीच जामीन मंजूर झाला होता.

मात्र, या प्रकरणातील डॉ. वीरेंद्र तावडे, अमोल काळे आणि शरद कळसकर या तिघांना जामीन मंजूर झाला नव्हता. जामीन न मिळाल्यामुळे तिघेही कळंबा कारागृहात होते. आज तिघांच्याही जामीन अर्जावर मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापुरातील सर्किट बेंच इथं सुनावणी झाली. यामध्ये तिघांनाही न्यायालयाने जामीन मंजूर केलाय.



त्यामुळे कॉम्रेड गोविंद पानसरे हत्या प्रकरणातील आजपर्यंतचे एकूण सर्वच १२ संशयीतांना आता जामीन मंजूर झाला आहे.

दरम्यान याच मुद्द्यांवर बोट ठेवत सनातन संस्थेने निरपराध हिंदुत्वनिष्ठांची साडे नऊ वर्षांची भरपाई कोण करणार? असा सवाल केला आहे.पानसरे हत्याप्रकरणी निष्पाप हिंदुत्वनिष्ठ डॉ. वीरेंद्र तावडे, अमोल काळे आणि शरद कळसकर यांना जामीन मंजूर झाल्यानंतर त्यांनी हा प्रश्न उपस्थित केला आहे.

२० फेब्रुवारी २०१५ रोजी कम्युनिस्ट पक्षाचे नेते कॉम्रेड गोविंद पानसरे यांची कोल्हापुरात राहत्या घरी गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. त्याच दरम्यान अंनिसचे संस्थापक डॉ. नरेंद्र दाभोलकर आणि दक्षिणेतील विचारवंत एम. एम. कलबुर्गी, जेष्ठ पत्रकार गौरी लंकेश यांच्याही हत्येशी संबंध होता. मात्र, महाराष्ट्रातील तपास यंत्रणांना या हत्येचा तपास सुरु असताना यश आलेलं नव्हतं. जेव्हा गौरी लंकेश हत्या प्रकरणात अटक झाल्या. त्यानंतर गोविंद पानसरे हत्या प्रकरणात तपास यंत्रणांना यश मिळण्यास सुरुवात झाली होती. मात्र अखेर या प्रकरणातील सर्व संशयितांना आज जमीन मंजूर झाला आहे.

## महापालिकेची अंतिम प्रभाग रचना जाहीर

**लातूर/प्रतिनिधी**: मागील तीन महिन्यांपासून महानगरपालिकेच्या प्रभाग रचनेवर काम करण्यात येत होते. सुरुवातीला प्रारूप प्रभाग रचना तयार करून तिच्यावर हरकती मागविण्यात आल्या होत्या. त्यांचे निराकरण झाल्यानंतर आता अंतिम प्रभाग रचना जाहीर झाली आहे. २०१७ च्या महापालिका निवडणुकीप्रमाणेच प्रभाग रचना असली तरी प्रभाग १३ मधील काही भाग यावेळी प्रभाग १२ मध्ये घेण्यात आला आहे. एवढा बदल वगळता २०१७ प्रमाणेच संपूर्ण प्रभाग रचना अंतिम करण्यात आली आहे. पहिल्या १६ प्रभागांतून प्रत्येकी चार नगरसेवक तर शेवटच्या प्रभाग १७ व प्रभाग १८ प्रत्येकी तीन सदस्य निवडून द्यावयाचे आहेत.

- **प्रभाग १ :** व्यंकटेश नगर, बेळंबे नगर, काळे गल्ली, सूळ गल्ली, नांदगाव वेस, पटेल चौक, राम गल्ली, मिस्किनपुरा भाग, सिध्देश्वर वेस, लाड गल्ली, माळी गल्ली.
- **प्रभाग २ :** बरकत नगर, हरिभाऊ नगर, वकील कॉलनी, तुळजापुरे नगर, गवळी नगर, कुंभार गल्ली, एसओएस बालग्रामचा भाग.
- **प्रभाग ३:** गरूड चौकाचा दक्षिण भाग, बालाजी नगर, संत गोरोबा सोसायटी, दसरा मैदान, शाहू नगर, ज्ञानेश्वर विद्यालय, महादेव नगरचा काही भाग.
- **प्रभाग ४:** आनंद नगर, संजय नगर, इंद्राळे नगर, इस्लामपुरा, न्यू काझी मोहल्ला.
- **प्रभाग ५:** मंठाळे नगर, डालडा फॅक्ट्री, शिवाजी कॉलेज, मोची गल्ली, बादाडे नगर, गौसपुरा.
- **प्रभाग ६:** वीर हणमंतवाडी, मार्केट यार्ड, गांधी नगर, गंजगोलाई, शासकीय मेडिकल कॉलेज, हनुमान चौक, चंद्रनगर, मारवाडी स्मशानभूमी, शाहू चौक.
- **प्रभाग ७ :** मांग गारूडी वस्ती, म्हैसूर कॉलनी, सिध्दार्थ सोसायटी, पोलीस क्वॉटर्स, बौध्द नगर, यशवंत शाळा.
- **प्रभाग ८:** देशपांडे गल्ली,रत्नापूर चौक, हत्तेनगर, लाहोटी कंपाऊंड, खाटीक गल्ली, भोई गल्ली, आझाद चौक, पोचम्मा गल्ली, नावंदर गल्ली, गांधी मैदान.
- **प्रभाग ९ :** उस्मानपुरा, सावेवाडी, त्रिमूर्ती नगर, खोरे गल्ली, मित्र नगर, श्रमसाफल्य सोसायटी, ज्ञानेश्वर नगर, केशव नगर, जाफर नगर.
- **प्रभाग १०:** शारदा कॉलनी, इंडिया नगर, सुभेदार रामजी नगर, ज्ञानेश्वर सोसायटी, श्याम नगर, नेताजी नगर, बँक कॉलनी, कल्पना नगर, पद्मा नगर.
- **प्रभाग ११:** विक्रम नगर, स्वामी समर्थ नगर,अग्रोया नगर, दीपज्योती नगर, श्रीनगर, महाराष्ट्र हौसिंग सोसायटी, एम आयडीसी, शासकीय कॉलनी.
- **प्रभाग १२:** चौधरी नगर, एमएसईबी कॉलनी, अवंती नगर, विठ्ठल-रुक्मिणी नगर, पंचवटी नगर, सोना नगर, सरस्वती सोसायटी.
- **प्रभाग १३:** प्रकाश नगर, संभाजी नगर, दयानंद कॉलेज, क्रांती नगर, सैनिक पुरी, कपील नगर.
- **प्रभाग १४:** लक्ष्मी कॉलनी, सरस्वती कॉलनी, कालिकादेवी मंदिर, वैभव नगर, सौभाग्य नगर, विजय कॉलनी, एस.टी डेपो, खणी भाग.
- **प्रभाग १५:** सिग्नल कॅम्प, शिवाजी नगर, को-ऑप इंडस्ट्रीयल, राम नगर, सीताराम नगर, नारायण नगर, आदर्श कॉलनी, गुणगुणे नगर, देशपांडे कॉलनी, कन्हेरी तांडा, विश्वेश्वरय्या कॉलनी.
- **प्रभाग १६ :** विवेकानंद हॉस्पिटल, राजस्थान विद्यालय, सूतगिरणी, बोधे नगर, मोरे नगर, मंत्री नगर, मोती नगर, कडबा मार्केट.
- **प्रभाग १७:** एलआयसी कॉलनी, कन्हेरी गाव, ज्ञानेश्वर नगर, गुरू हॉटेल, बांधकाम भवन, विराट हनुमान, परिवार सोसायटी, लक्ष्मण नगर, तुळजाभवानी नगर, सुशीलादेवी नगर.
- **प्रभाग १८:** पटेल नगर, माताजी नगर, कातपूर रोड, बसवेश्वर चौक, पोस्ट कॉलनी, शनि मंदिर, पिनाटे नगर, नंदनवन कॉलनी, मजगे नगर, खंदाडे नगर, टॉवर लाईन, सुजानगीर नगर, शंकरपूरम नगर

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**राज्यातील जिल्हा परिषद व पंचायत समित्यांचे आरक्षण जाहीर...**



**चिमटा दयाचा**

शेती नुकसान पाहणी काम चालू आहे ! भक्कम मदतीची गरज आहे !! आतातर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत वारे वाहणार आहे!!!

## मुंबई, ठाणे व पुणे येथुन तिन पिडीत मुलींचा शोध अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षास यश

**लातूर/प्रतिनिधी :** मुंबई, ठाणे व पुणे येथुन तिन अपहरत मुलींचा शोध घेण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षास यश आले असून तीन अल्पवयीन मुलींना कोणीतरी अज्ञात व्यक्तीने पळवून नेले वरुन अनुक्रमे पोलीस स्टेशन गांधी चौक, औराद शहाजानी व एम.आय.डी.सी येथे गुन्हे दाखल होते.

पोलीस स्टेशन गांधी चौक गुरनं. २१९/२०२२ कलम ३६३,३६६ (अ), १०९ भादंवि. प्रमाणे दाखल असलेल्या गुन्हयामध्ये मागील ३ वर्षापेक्षा जास्त कालावधीपासुन पोलीस स्टेशन कडुन पिडीत मुलीचा शोध सुरु होता. पोलीस स्टेशन एमआयडीसी गुरनं. ४७८/२०२३ कलम ३६३,३६६ भादंवि. व पोलीस स्टेशन औराद शहाजानी गुरनं. ४५/२०२५ कलम १३७ (२) भा.न्या.सं. प्रमाणे संबंधीत पो.स्टे. येथे गुन्हे दाखल होते.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे नमूद गुन्ह्यांचा आढावा घेऊन अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाकडुन वरील दाखल असलेल्या तिनही गुन्हयांचा समांतर तपास करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाकडुन समांतर तपासात गोपनिय माहिती व तांत्रीक माहिती संकलीत करुन त्याच्या विश्लेषणाचे अधारे तिनही गुन्हयातील पिडीत मुली व आरोपी हे पुणे मुंबई व ठाणे येथे असल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्यावरुन HTU टीम दिनांक ०८/१०/२०२५ ते ११/१०/२०२५ रोजी दरम्यान मुंबई, ठाणे व पुणे येथे जावुन तिनही गुन्हयातील अपहरत पिडीत मुलींचा व आरोपींचा शोध घेण्यात HTU टीम यश मिळाले आहे.




पोलीस स्टेशन गांधी चौक, लातूर येथे दाखल असलेल्या गुन्हयातील पिडीत मुलगी भवानी नगर, भिवंडी जि.ठाणे येथे मिळुन आली आहे. व पोलीस स्टेशन औराद शहाजानी येथे दाखल असलेल्या गुन्हयातील पिडीत मुलगी व आरोपीस रामनगर, कांदिवली (पश्चिम), मुंबई येथे मिळुन आले आहेत. तसेच पोलीस स्टेशन एमआयडीसी येथे दाखल असलेल्या गुन्हयातील पिडीत मुलगी व आरोपीस फर्गुसन कॉलेज पुणे समोरुन येथे मिळुन आले आहेत. सदर अपहरत पिडीत मुलीना व आरोपींना संबंधीत पोलीस स्टेशन येथे हजर केले आहे.

सदरची कारवाई भा. पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे व अपर पोलीस अधीक्षक श्री. मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक भालचंद तिडेके पोलीस अंमलदार सदानंद योगी, प्रकाश जाधव, सुधामती यादव (वंगे), लता गिरी, निहाल मनियार यांचे पथकाने पार पाडली आहे.

## दीपावली सणानिमित्त २१ व २३ ऑक्टोबर रोजी विलासराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयातील ओपीडी राहणार बंद

**लातूर/प्रतिनिधी :** दिपावली सणानिमित्त विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील व रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी) दीपावली सणानिमित्त मंगळवार, २१ ऑक्टोबर आणि गुरुवार, २३ ऑक्टोबर २०२५ रोजी बंद राहील. तसेच सोमवार, २० ऑक्टोबर आणि बुधवार, २२ ऑक्टोबर २०२५ रोजी ओपीडी सुरु राहील. रुग्णालयाची आपत्कालीन सेवा २४ तास सुरु राहणार आहे. शुक्रवार, २४ ऑक्टोबर, २०२५ रोजी पासून बाह्यरुग्ण विभाग नियमित वेळेप्रमाणे सुरु राहील, असे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील व रुग्णालयामार्फत कळविण्यात आले आहे.

## सर्व शासकीय व खाजगी आस्थापनांनी ईआर-१ विवरणपत्र सादर करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** सर्व शासकीय व खाजगी आस्थापनांना त्रैमासिक विवरणपत्र ईआर-१ प्रत्येक तिमाही संपल्यानंतर ३० दिवसांच्या आत ऑनलाईन सादर करणे बंधनकारक आहे. ही तरतूद रिक्तपदे सक्तीने अधिसुचित करणारा अधिनियम १९५९ आणि त्याअंतर्गत नियमावली १९६० नुसार लागू आहे. केंद्र व राज्य शासन, अंगिकृत उद्योग, व्यवसाय, महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषद, पंचायत समिती, महापालिका, नगरपालिका तसेच खाजगी क्षेत्रातील आस्थापनांनी हे विवरणपत्र ३१ ऑक्टोबर २०२५ पूर्वी ऑनलाईन सादर करण्याचे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त निशांत सूर्यवंशी यांनी केले आहे.

ईआर-१ सादर करण्यासाठी नियोक्त्यांनी https://rojgar.mahaswayam.gov.in या वेबपोर्टलवर एम्प्लॉयर लॉगईनमध्ये युजर आयडी आणि पासवर्ड वापरून लॉगईन करावे. त्यानंतर डॅशबोर्डवरील ईआर-१ ऑप्शनवर क्लिक करून, एंटर ईआर-१ वर क्लिक करत विवरणपत्र सादर करावे, विवरणपत्र सादर करताना तांत्रिक अडचणी उद्भवल्यास ०२३८२-२९९४६२ या क्रमांकावर संपर्क साधावा, असेही श्री. सूर्यवंशी यांनी कळविले आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

# योजना बंद होता कामा नये

महाराष्ट्रात अनेक योजना चालू करण्यात आल्या होत्या. त्यात मुख्यमंत्र्याच्या नावाने असलेल्या योजना होत्या.नाव नेत्याचे नव्हते केवळ मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर योजना, युवकासाठी योजना होत्या. आता यातील काही योजना बंद करण्याचा विचार होत असेल तर ते योग्य नाही. योजनाचा लाभ मिळत नसेल किंवा अप्रिय योजना असेल तर बंद केल्या पाहिजेत. गोरगरीबासाठी आवडीचा असलेली आनंदाचा शिधा ही योजना बंद केली आहे त्यामुळे जनतेत नाराजी दिसून येत आहे. ही मोफत नव्हती तर शंभर रुपयात थोड्याफार सणासाठी वापरात येणाऱ्या वस्तू भेट मिळत होत्या. त्यामुळे पाढवा असो किंवा अन्य सणाच्यावेळी वाटप होत होते. ती बंद केली. त्यानंतर विधानसभेच्या तोंडावर लाडकी बहिण योजना चालू केली. त्यावेळी न मागता सर्वच महिल्यांच्या खात्यात रकमा जमा होऊ लागल्या. त्यानंतर याही योजनेस चाळणी लावली आहे व लावली जात आहे. न मागता योजना दिल्या जातात व नंतर न सांगता बंदही केल्या जातात ही वृत्ती योग्य दिसणारी नाही. राज्यात निधीची कमतरता दिसून येत असेल तर पर्याय शोधला पाहिजे. योजना बंद करणे योग्य नाही. आपण योजना चालू करावयाच्या, आपणच बंद करावयाच्या ही बाब योग्य नाही. मुळात राज्यात अतिवृष्टी झाली. हा निसर्गाचा प्रकोप आहे. त्यामुळे निसर्गाला जबाबदार धरले जाते. निसर्ग कोपला तर काय करू शकते याचा विचार केलेला बरा. या अतिवृष्टीने अनेकांची नुकसान केले. ते सुधारण्यासाठी भरीव निधीची आवश्यकता भासणार आहे. त्यात शेतकऱ्यांना मदत करावी लागणार आहे. अशा स्थितीत निधीची उभारणी मर्यादित असताना खर्च करावा लागणार आहे. मुळात अनेक योजना चांगल्या असल्यातरी त्या योग्य प्रकारे राबविल्यातर निश्चित सकारात्मक परिणाम दिसून येतो. योजना सुरवातीला विचार करून चालू केल्या पाहिजेत. अभ्यास केला पाहिजे. कोणताही विचार न करता बंद करणारा असाल तर ते योग्य नाही. राज्यात महायुतीचे मोठे तीन पक्षाचे सरकार आहे. यावरही मोठा खर्च येत असेल. सर्वात मोठी आडचण निधीची येत असल्याने आलिकडे अनेक योजनेस कात्री लावली जात आहे असे दिसून येते. सध्याला काही बाबतीत काटकसर ही सर्वात महत्वाचे आहे. ती दिसून येत नाही. विचार केला तर मंत्री, आमदार किंवा खासदार यांच्यासाठी दरवर्षी होणारा खर्च व शेतकऱ्यावर होणारा खर्च याबाबत तुलनात्मक विचार केला तर अनेक बाबी कळून येतील. सर्वाधिक आडचणीत शेतकरी आहे. अतिवृष्टीची मोठी झळ ही शेतकऱ्यास बसली आहे. त्यामुळे शेतकऱ्याकडे पाहिल्यांदा लक्ष देणे अपेक्षित आहे. त्यात काही योजना निधी अभावी म्हणा किंवा अन्य कारणामुळे बंद होणार असेल तर त्या मागणी नसताना चालू का केल्या याचा विचार केला पाहिजे. ज्यावेळी एकनाथ शिंदे यांच्या हाती राज्याची सुत्रे होती त्यावेळीची परिस्थिती व सध्याची परिस्थिती याचा तुलनात्मक विचार केला तर काही स्पष्टता जावणार आहे. त्यामुळे नागरिकांनी आता यापुढे मागू नये. जे शक्य आहे त्याचीच मागणी करावी. त्याच प्रमाणे आज एका योजनेमुळे राज्यात आर्थिक संकट ओढावले आहे हे खाजगीत मान्यच केले पाहिजे. त्यातही कात्री लावली जात आहे. केवायसीची सक्ती केली जात आहे. मुळात जनतेला स्वावलंबन व स्वकृत्वाची धडे दिले नाहीत. आळशी व मोफत मागण्याची सवय कोणी लावली? कर्ज माफीची सवय कोणी लावली? मुळात पहिल्यांदा सवय लावायाची नंतर डोईजड होताच बंद करण्याचा विचार करावयाचा हे योग्य नाही. इतर देशात व भारतातीय नागरिकांत हाच तो फरक आहे. इतर देशात स्वकृत्व व स्वावलंबन प्रत्येकात अंगीकारले आहे. मुळात आपल्या देशात पहिल्यांदा सवय लावली जाते नंतर ती सोड म्हटले तरी शक्य होत नाही. त्याच प्रमाणे आरोग्य व शिक्षण मोफत केले तर कोणीही संघर्ष करणार नाही. सध्याला मार्ग हा योग्य निवडला जात नाही. त्यामुळे चांगले काम करणारे सरकारवर नाराजगी व्यक्त करतात. मुळात आपला देश मोठा आहे. त्यात युपी व महाराष्ट्र हे दोन प्रांत मोठे आहेत. अशा मोठ्या प्रांतात योग्य नियोजनाची गरज आहे. योजना चालू करावयाची नंतर बंद करावयाची? दुसरी, तिसरी योजना चालू करून जनतेला वेड्यात काढण्यापेक्षा अशी काही योजना जाहिर करावी की, भारतीय जनता स्वावलंबी व स्वकृत्वान बनेल. मागणारी नाही तर देणारी निर्माण करावी. तुटपुंजी मदत देऊन एकतर त्याचे भागत नाही मात्र समोरचा दिले म्हणून रुबाब मिरवित असतो. त्यामुळे चुकीचा मार्ग निवडण्यापेक्षा योग्य मार्ग निवडला तर सर्वजन समाधानी व आनंदी राहातील. सध्याला कोणीही समाधानी दिसून येत नाही. सर्वजन अल्पसंतोषी दिसून येतात. त्यामुळे विशेष करून राज्यकर्त्यांनी विचारपुर्वक वाटचाल केली पाहिजे. आनंदाचा शिधा चालू केला पाहिजे. जनतेला चांगल्या प्रतीचे अन्नधान्य रेशन दुकानातून दिले पाहिजे. देताना चांगले देण्याचा विचार केला पाहिजे. मुळात चांगल्या प्रतीचे स्वस्त धान्य दुकानातून गव्हू व तांदुळच वाटप होणे अपेक्षित आहे. तेल किंवा साखर बेपत्ताच दिसून येते. त्यामुळे अशा स्थितीत काही बाबी सरकारला दिसत नाहीत असे नाही तर दिसते मात्र त्याला लगाम लावण्याचे सामार्थ्य दिसून येत नाही. ते जर लावले तर स्वर्ग निर्माण होऊ शकेल. मुळात काहींची मानसिकता चांगले निर्माण करण्याची दिसून येत नाही. चालत आले आहे ना मग चालू द्या! त्यामुळे जनतेच्या मनात निराशेची भावना निर्माण होते. राज्यात सध्याला सरकारचे भाग्य चांगले आहे कारण राज्यात प्रबल असा विरोधी पक्ष जनतेला दिसून येत नाही. मोठा पर्याय दिसून येत नाही. ज्यावेळी पर्याय व योग्य वेळ दिसून येईल त्यावेळी वेळ निघून गेलेली असेल. त्यामुळे वेळीच विचार करून पावले टाकली पाहिजेत. जनतेनी सुद्धा आता मोफत मागण्याचे बंद केले पाहिजे. एका वर्षासाठी मागणे बंद करा. काय परिणाम दिसेल हा अनुभवा निश्चित काही बाबी सकारात्मक दिसून येतील. योजना बंद करून योग्य होईल हा समज चुकीचा आहे याबाबत विचार केला पाहिजे.

# गायक किशोर कुमार स्मृतिदिन



पार्श्वगायक, संगीतकार, गीतकार, निमर्ता, दिग्दर्शक, आभिनेता व पटकथालेखक किशोर कुमार यांचे खरे नाव आभासकुमार गांगुली. भारतीय चित्रपटसृष्टी्चा इतिहास लिहायचा झाल्यास किशोरकुमार या नावा शिवाय तो पूर्णच होऊच शकणार नाही. १९६०च्या दशकातील देवआनंद पासून ते १९८०च्या दशकातील अनिल कपूर पर्यंतच्या् अनेक नायकांना यशाची चव चाखविण्यात किशोरदांचा वाटा मोठा आहे. बॉलीवूडला पहिला सूपरस्टार राजेश खन्ना यांच्या रुपाने मिळाला मात्र त्यामागेही किशोरदांचा खास योडली आवाजच होता हे नाकारून चालणार नाही. या हरहुन्नमरी नायक व गायकाच्या गायनात तल्लीन होऊन गाणारा गायक म्हणून किशोर कुमार यांची आबालवृद्धा मध्ये ओळख आहे. किशोरदांनी गाण्यात जीव ओतून त्यांना विविध रंग चढवून मैफिली सजविल्या आहेत. चित्रपटातही ते चमकले. त्यांनी सुमारे ४०० हून अधिक चित्रपटांत गाणी गायिली. 'चलती का नाम गाडी' सारख्या निखळ विनोदी चित्रपटा बरोबरच 'दूर गगन की छाँव में' सारखे गंभीर चित्रपटही काढले. किशोरदाचे वडीलबंधू दादा मुनी उर्फ अशोक कुमार व अनुप कुमार यांचे बोट धरून स्वत:चे नशीब अजमावण्यासाठी त्यांनी चित्रपटातील अभिनयातून करियरचा श्रीगणेशा केला. त्यावेळी चित्रपट सृष्टीत अभिनेत्यामध्ये सर्व गुण पाहिले जात होते. त्यात अभिनेत्याला गायनाच्या कसोटीमधून ही जावे लागत होते. १९५० मध्ये आभास कुमार व कुंजालाल गांगुली यांनी किशोर कुमारला 'मुकद्दर' मध्ये काम दिले. त्यात किशोरदाचा रोल ही तसा चांगलाच होता. मात्र त्यात त्यांना गायनाची संधी मिळाली नाही. त्यानंतर १९५१ मध्ये किशोरदा मन्नाडे यांच्यासह गायलेच. मात्र त्यांना त्यावेळी त्यांनी जागा मिळाली ती पार्श्वगायकांच्या मध्ये, तीही 'आंदोलन' चित्रपटात. प्रत्येक व्यक्तीच्या मागे मोठा संघर्ष असतो व त्या संघर्षाला किशोरदाही कसे अपवाद राहणार. १९५२ ते १९६० दरम्यान किशोरदाने बऱ्याच चित्रपटांमध्ये भूमिका केल्या. अधिकार, धोबी डॉक्टर, इल्जाम, मिस माला, नोकरी, पहिली झलक हे चित्रपट तर त्यांनी अवघ्या एका वर्षात म्हणजेच १९५४ मध्ये आटोपल्या. त्यानंतर त्यांनी अभिनयासह आवाजाला दिशा मिळाली. अभिनय व गायन यांचा किशोरदांचा समांतर प्रवास सुरू झाला. १९५६ मध्ये नऊ चित्रपट करणारा अभिनेता म्हणून त्यांनी त्यांची नवीन ओळख जगाला करून दिली. किशोरदाने आपल्या मिश्किल स्वभावाने चित्रपट सृष्टीत विनोदी भूमिकांचा नवा ट्रेंड आणला. अभिनय करताना गायन व संगीताच्या तालावर थिरकणे या त्रिवेणी कलांचा संगम असलेल्या किशोर नी दर्शकांसह श्रोत्यांवर भुरळ घातली. नायकासह गायक यांच्या भूमिकेने तर दर्शकांना मंत्रमुग्ध केले. त्यानंतर त्यांनी मीना कुमारी, वैजयंती माला, निम्मी, कामिनी कौशल, मधुबाला, नूतन, माला सिन्हा व बीना रॉय यांच्या सारख्या नायिकांसोबत चित्रपट केले. अभिनयासह त्यांनी या चित्रपटामध्ये गायनाची दुहेरी भूमिका केल्याने तर त्यांनी त्यांचे नाव यशाच्या शिखरावर पोहचविले. 'मेरा नाम अब्दुल रहमान', 'नखरे वाली', 'कुंएँ मे कुद जाना यार पर शादी मत करना', 'इना मीना डिका', 'हम तो मोहब्बत करेगा', 'पाच रुपया बारा आणा' अशा एक ना अनेक गीतांमधून किशोरदा आपल्यात आहेत. एके दिवशी अशोक कुमार यांच्या घरी अचानक संगीतकार सचिन देव बर्मन आले. तेव्हा बाथरुममध्ये असलेल्या किशोरदांचे स्वर त्यांच्या कानी पडले. 'कौन गा राहा है?' असे त्यांनी दादामुनींना विचारले. त्यावर अशोक कुमार यांनी मोठ्या गायकाची ओळख सचिन देव बर्मनला करून दिली. तेव्हा सुप्रसिद्ध संगीतकार सचिनदेव बर्मनने 'बाथरूम सिंगर' किशोरदाला ओळखले. तेव्हा पासून सुमधुर गीतांचा झरा किशोरदांच्या कंठातून वाहायला प्रारंभ झाला. यादगार गीतांना स्वर देणारे किशोर कुमार त्यानंतर चित्रपटाचे निर्माता, दिग्दर्शक तर गीतकार यांच्या भूमिकेत पडद्यावर दिसू लागले. त्यांनी त्याच्या चित्रपटासाठी गीते लिहिली नाही तर त्यांनी संगीतही दिले. 'चलती का नाम गाडी', 'बढती का नाम दाढी', 'जमीन', 'दूर का राही', 'झुमरू' आदी चित्रपट किशोरदांनी दर्शकांना नव्या रूपात दिले. एक चतुर नार, गोरे रंग पे ना इतना गुमान कर, ये रातें ये मौसम नदी का किनारा ये चंचल हवा, दिल क्या करे जब किसी को किसी से प्यार हो जाए, अशा अनेक सदाबहार गितांनी मंत्रमुग्ध करणारे ते पार्श्वगायक होते.

जन्म - ४ ऑगस्ट १९२९ (कोलकाता)
स्मृती - १३ ऑक्टोबर १९८७ (मुंबई)

**संजीव वेलणकर, पुणे**
९४२२३०१७३३
संदर्भ : इंटरनेट
संकलन : मिलिंद पंडित, कल्याण

# तुर्की महिला रझिया सुलतान स्मृतिदिन



दिल्ली तख्तावर राज्य करणारी तार्तर (इल्बारी) घराण्यातील पहिली महिला रजिया सुलतान. तिचे चारित्र्य, चरित्र आणि कर्तृत्व यांविषयी इतिहासात अनेक कथा, दंतकथा, वदंता प्रचलित आहेत. रझिया विषयीची माहिती मुख्यत्वे फिरिश्ता खुसरौ वगैरे तत्कालीन लेखकांच्या ग्रंथांतून मिळते. रझिया ही अल्तमश याची एक हुशार मुलगी. तिला त्याने लहानपणी धार्मिक व लष्करी शिक्षण दिले. राज्यकारभारातही तो अनेक वेळा तिला सहभागी करून घेत असे. राजपुत्र नासिरुद्दीन मुहम्मद याच्या आकस्मिक मृत्यू नंतर (१२२९) अल्तमशने इतर सर्व राजपुत्रांना डावलून भावी वारस म्हणून रझियाचीच निवड केली होती. ग्वाल्हेर मोहिमेच्या वेळी त्याने शासनाची सर्व जबाबदारी रझियावर टाकली; तथापि तुर्की सरदारांना राजपुत्र हयात असताना एका स्त्रीचे वर्चस्व अपमानास्पद वाटू लागले. अल्तमशच्या मृत्यू नंतर रुक्नुद्दीन फीरुझशाह याला सरदारांनी गादीवर बसविले. तो दुर्व्यसनी व चैनी होता आणि प्रत्यक्षात सर्व सत्ता त्याची आई शाह तुर्कान बेगम हिच्याकडे होती. तिने रझियासह सावत्र मुलांना नष्ट करण्याचे कटकारस्थान रचले. कट उघडकीस येताच चाळीसगुणी शम्सी सरदारांत असंतोष माजला आणि त्यांनी रझियाच्या मदतीने रुक्नुद्दीन विरुद्ध बंड करून रझियाला सुलतान रझियतुधीन या नावाने दिल्लीच्या तख्तावर बसविले (७ नोव्हेंबर १२३६). बुरखा टाकून ती दरबारात बसू लागली. पुरुषी वेश धारण करून हत्तीवर बसून ती प्रजेस दर्शन देत असे. रणांगणातील नेतृत्व ती स्वतः करी. प्रत्येक काम ती स्वतः पाहून निकालात काढीत असे.

तिने दरबारातील प्रमुख सरदारांना विश्वासात घेतले आणि हिंदूंवरील जझिया कर रद्द केला. रस्त्यांची व्यवस्था, इमारतींची डागडुजी आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था इ. तिच्या महत्त्वाच्या सुधारणा होत. तिने प्रशासनात शिस्त आणली. आपल्या नावाने नाणी पाडली. नाण्यांवर उम्दत-उल-निस्वा अशी मुद्रा असे. राज्यावर येताच वजीर निजामुल्मुल्क मुहम्मद जुनैदी व बदाऊन, मुलतान, हांसी, लाहोर इ. ठिकाणच्या राज्यपालांनी तिच्याविरुद्ध बंड पुकारले. परंतु नुस्रतद्दीन तायसी, इज्जुद्दीन मुहम्मद सालारी, कबीरखान आयार इत्यादींच्या मदतीने तिने भेदनीतीचा उपयोग करून विरोधकांचा निःपात केला आणि राज्यात शांतता प्रस्थापिली. ग्वाल्हेरचा किल्ला सर केला आणि रणथंभोर मधील मुस्लिम सैनिकांना मुक्त्त केले. तुर्की सरदारांचे वर्चस्व कमी करण्याच्या उद्देशाने जमालुद्दीन याकूत नावाच्या बिसिनियन गुलामाला शाही तबेल्याचे अमीर उल उम्र (प्रमुख) नेमले व त्यास अनेक अधिकार दिले. याशिवाय विश्वासातील सेवकांना उच्चपदे दिली. परिणामतः शम्सी सरदारांना एका स्त्रीचे वर्चस्व अपमानास्पद वाटू लागले. काही विश्वासू अमीरही तिच्या विरोधात गेले. लाहोरच्या कबीरखान आयार याने बंडाचे निशाण उभारले. भतिंडाच्या मलिक आल्तुनियाने तिच्या सम्राज्ञी पदालाच आव्हान दिले. त्याच्याशी मुकाबला करण्यासाठी तिने पराक्रमाची शर्थ केली. परंतु तंबूतच तुर्की सरदारांनी जमालुद्दीन याकूतला ठार केले. त्याच्या मृत्यूने ती खचली. तिचा पराभव होऊन तिला तुरुंगात टाकण्यात आले. दरम्यान तिचा सावत्र भाऊ बेहरमशाह यास दिल्लीचे सुलतानपद देण्यात आले. तेव्हा तिने आल्तुनियाशी संगनमत करून त्याच्याशी लग्न केले आणि उभयतांनी गख्खर, जाट व भाडोत्री सैन्य घेऊन दिल्लीकडे आगेकूच केली. जलालुद्दीन बल्बन याने दिल्ली कटेहर मार्गावरील कैथलच्या युद्धात त्यांचा पराभव केला. आल्तुनिया व ती पळून जात असता अज्ञात इसमांनी उभयतांचा वध केला. तिने चोख कारभार केला. खुसरौच्या मते तिच्या हातून क्षुल्लकशी ही चूक घडली नाही. तिचे थडगे जुन्या दिल्ली मध्ये बुलबुलीखाना नावाने प्रसिद्ध आहे. याकूत - रझिया - आल्तुनिया यांतील जवळिकी मुळे नंतरच्या काळात काही रोमांचकारी वदंता प्रसृत झाल्या आहेत.

**जन्म - १२०५ (बदायु,उत्तरप्रदेश)**
**स्मृती - १३ ऑक्टोबर १२४० (कैथल,दिल्ली)**

संकलन : मिलिंद पंडित, कल्याण
संदर्भ : विकास पीडिया

# 'या' ५ लोकांनी चुकूनही खाऊ नका वांग, आरोग्यास अतिशय हानिकारक

वांग्याचा भरता किंवा वांग्याची करी कोणाला आवडत नाही याशिवाय वांग्यांपासून अनेक प्रकारचे स्वादिष्ट पदार्थ तयार केले जातात. पण तुम्हाला माहित आहे का की तुम्ही जी वांगी खूप चवीने खातात ती अनेकांना पूर्णपणे वर्ज्य आहे. होय, आयुर्वेदानुसार अशा ५ आजारांचा उल्लेख आहे, ज्यामुळे रुग्णांनी चुकूनही वांग्याचे सेवन करू नये. जर या लोकांनी वांग्याचे सेवन केले तर ते त्यांच्या आरोग्याला खूप हानी पोहोचवू शकतात. आज या लेखाच्या माध्यमातून आम्ही तुम्हाला अशाच ५ आजारांबद्दल सांगणार आहोत ज्यामध्ये वांगी खाणे टाळले जाते.



**मुतखड्याचे रुग्ण**

जर तुम्ही स्टोनचे रुग्ण असाल तर तुम्ही वांग्याचे सेवन टाळावे. याचे कारण म्हणजे वांग्यात ऑक्सलेट नावाचे तत्व आढळते. जे दगड तयार करण्याचे काम करते. मुतखड्याचा त्रास असूनही जर तुम्ही वांग्याचे सेवन केले तर ते तुमच्या मुतखड्याचा आकार आणखी वाढवू शकते. अशा स्थितीत मुतखड्याच्या रुग्णाने वांग्याचे सेवन करू नये.

**ऍनिमिक रुग्ण**

जर तुम्हाला ऍनिमियाचा त्रास होत असेल तर चुकूनही वांग्याचे सेवन करू नये. वांग्याचे सेवन केल्याने आपल्या शरीरात लोहाची कमतरता निर्माण होते, त्यामुळे ऍनिमियाच्या रुग्णांनी चुकूनही वांगी खाऊ नयेत. तुम्हाला ऍनिमिया असल्यावरही तुम्ही वांग्याचे सेवन केले तर तुमची समस्या आणखी वाढू शकते.

ऍलर्जी रुग्ण

जर तुम्हाला शरीरातील कोणत्याही प्रकारची ऍलर्जी होत असेल तर तुम्ही वांग्याचे सेवन करू नये. वास्तविक, वांगी हे नाईटशेड कुटुंबातील आहे ज्यामुळे आपल्याला ऍलर्जी होऊ शकते. त्यामुळे जर तुम्हाला खाज, सूज आणि पुरळ येत असेल तर तुम्ही वांग्याचे सेवन करू नये. यामुळे तुमची ऍलर्जीची समस्या आणखी वाढू शकते.

**पाचक समस्या असलेले रुग्ण**

जर तुम्हाला पचनाची कोणतीही समस्या असेल किंवा तुमचे पोट वारंवार खराब होत असेल तर अशा परिस्थितीत तुम्ही चुकूनही वांग्याचे सेवन करू नये. जर तुम्हाला पोटदुखी, अपचन, अपचन किंवा पचनाची इतर कोणतीही समस्या असेल तर तुम्ही वांगी खाणे टाळावे. पचनाशी संबंधित समस्या असलेल्या लोकांना वांग्याचे सेवन करण्यापासून दूर राहण्याचा सल्ला दिला जातो.

**डोळ्यांचे रुग्ण**

जर तुम्ही डोळ्यांशी संबंधित कोणत्याही समस्येने त्रस्त असाल तर तुम्ही वांग्याचे सेवन टाळावे. जर तुम्हाला तुमच्या डोळ्यात जळजळ आणि सूज येण्याची समस्या असेल तर तुम्ही वांग्याचे सेवन करू नये. वांग्याच्या भरीताचे सेवन केल्याने डोळ्यांच्या समस्या झपाट्याने वाढू शकतात, त्यामुळे डोळ्यांच्या रुग्णांना वांग्याचे सेवन न करण्याचा सल्ला दिला जातो.

# लघवीला घाणेरडा वास येणे असू शकते ५ गंभीर आजारांचे संकेत

दुर्गंधीयुक्त लघवीची कारणे: लघवीचा रंग आपल्या आरोग्याची अनेक गोष्टी उलघडतात. लघवीतून येणारा वास तुमच्या आरोग्याचे रहस्यही उघड करतो. होय, लघवीला जास्त वास येण्याचा अर्थ असा होतो की तुम्ही काही समस्यांशी लढत आहात. अशा परिस्थितीत तुम्ही थोडे सावध राहणे आवश्यक आहे. तुमच्या लघवीला दुर्गंधी येत असेल तर ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्या. चला जाणून घेऊया लघवीला वास येण्याची कोणती कारणे आहेत

डिहायड्रेशनचा त्रास

शरीरात पाण्याची कमतरता हे लघवीला दुर्गंधी येण्याचे कारण असू शकते. जर तुम्हाला डिहायड्रेशनचा त्रास होत असेल तर लघवीमध्ये अमोनियाची पातळी वाढते. अशा स्थितीत लघवीला दुर्गंधी येते. ही स्थिती टाळण्यासाठी, तुम्हाला तुमच्या आहारात अधिकाधिक द्रवपदार्थांचा समावेश करावा लागेल.

**मधुमेहाचे लक्षण**

लघवीला खूप तीव्र वास येण्याचा अर्थ मधुमेह देखील असू शकतो. या काळात लघवी करताना थोडा गोड वास येतो. जर तुम्हालाही तुमच्या लघवीतून असा वास येत असेल तर समजा तुमच्या रक्तातील साखर खूप वाढली आहे. अशा लक्षणांकडे दुर्लक्ष करणे टाळा.

**यकृताचे विकार**

लघवीतील दुर्गंधी देखील यकृताच्या समस्या दर्शवते. तुमच्या लघवीला वास येत असेल तर त्याकडे दुर्लक्ष करणे टाळा. ही परिस्थिती खूप गंभीर असू शकते.

**अनुवांशिक विकार**

विकारांमुळे लघवी करताना दुर्गंधी देखील येऊ शकते. हे अनुवांशिक विकार पॅनेल केटोनुरिया म्हणजेच झख्ळ आणि मॅपल सिरप असू शकतात. ही समस्या बालपणातच शोधली जाऊ शकते, जी आयुष्यभर टिकते.

**यूटीआय समस्या**

युरिन इन्फेक्शनचा त्रास वाढला तरीही लघवीला उग्र वास येतो. या स्थितीत एखाद्याला कुजलेल्या अंड्यासारखे वाटते. तसेच, लघवीला वाफेचा वास येतो. जर तुम्हाला लघवीमध्ये जळजळीसह दुर्गंधी येत असेल तर ते ळऊघ सूचित करू शकते. अशा परिस्थितीत तुम्ही तज्ञांची मदत घ्यावी.

# मानसिक आरोग्य उत्तम राखण्यासाठी 'या' पदार्थांचं सेवन टाळा

जागतिक मानसिक आरोग्य दिन हा शारीरिक आरोग्याइतकंच मानसिक आरोग्यदेखील महत्त्वाचे आहे हे लक्षात आणून देणारा दिवस आहे. सध्या मानसिक आरोग्याबाबत बरीच जागरूकता आहेच, पण मानसिक आरोग्य आणि शारीरिक आरोग्य हे परस्परांवर अवलंबून आहे. ताण व्यवस्थापन, थेरपी आणि व्यायाम महत्त्वाचे आहेत. मात्र, जेव्हा तुम्हाला भावनिकदृष्ट्या कसे वाटते यावर तुम्ही आहार कसा घेता हेही अवलंबून आहे. मेंदू हा एक चयापचय दृष्टीने मागणी करणारा अवयव आहे. त्याला चांगल्या प्रकारे कार्य करण्यासाठी पोषक तत्वांची आवश्यकता असते. आपण जे काही खातो त्याचा न्यूरोट्रान्समीटर निर्मिती, आतड्यांचे आरोग्य आणि ऊर्जा चयापचय यावर शक्तिशाली प्रभाव पडतो. या सगळ्याचा थेट परिणाम आपण काय अनुभवतो आणि काय विचार करतो यावर होतो. त्यामुळेच मानसिक आरोग्य खूप महत्त्वाचे आहे.

योग्य अन्न पुरेशा प्रमाणात न मिळाल्याने मानसिक समस्या आणि आजार उद्भवू शकतात. संपूर्ण अन्नाचे सेवन केल्यास समृद्ध आहार मूड स्थिर ठेवण्यास लक्ष केंद्रित करण्यास आणि चिंता कमी करण्यास मदत करू शकतो. मात्र, प्रक्रिया केलेले किंवा साखरयुक्त पदार्थ थकवा, चिडचिडेपणा आणि नैराश्याची लक्षणेदेखील निर्माण करू शकतात, असे तज्ज्ञ सांगतात. विचारपूर्वक योग्य आहाराची निवड करून तुम्ही तुमच्या मेंदूला शांत, सकारात्मक आणि लवचिक राहण्यास मदत करू शकता. तेव्हा कोणत्या प्रकारचा आहार तुमचे मानसिक आरोग्य उत्तम राखू शकतो याबाबत जाणून घेऊ

**चरबीयुक्त मासे**

चरबीयुक्त माशांमध्ये ओमेगा-३ फॅटी ॲसिड असते. ते मेंदूच्या पेशींचे पटल (ईीरळप लशश्रश्र ाशालीरपशी) तयार करतात आणि न्यूरोट्रान्समीटरच्या कार्याला समर्थन देतात. मासे खाणाऱ्यांमध्ये अनेकदा नैराश्य आणि चिंता कमी असते.

**पालेभाज्या**

भरपूर फोलेट, मॅग्नेशियम आणि ॲंटी-ऑक्सिडंट्ससह, पालेभाज्या जळजळ आणि ऑक्सिडेटिव्ह ताणाशी लढतात. हे दोन्ही मानसिक विकारांशी संबंधित आहेत. फोलेट सेरोटोनिनचे उत्पादनदेखील वाढवते. ते आपल्या मूडच्या नियमनासाठी महत्त्वाचे आहे.

**आंबवलेले पदार्थ**

आंबवलेले अन्न निरोगी आतड्यांतील बॅक्टेरियांना आधार देते, ते सेरोटोनिन म्हणजेच चांगलं वाटणं किंवा आनंदी वाटण्यासाठीचे हार्मोन निर्माण करण्यासाठी महत्त्वाचे आहे. असंतुलित आतड्यातील मायक्रोबायोम भावनिक असंतुलन आणि अस्पष्ट विचारांशी जोडलेले असल्याचे तज्ज्ञ सांगतात.

**काजू आणि विविध बिया**

ओमेगा-३, व्हिटॅमिन ई आणि झिंकयुक्त पदार्थ मेंदूला चांगल्या प्रकारे कार्य करण्यास मदत करतात. तसंच तणावाची लक्षणे कमी करून स्मरणशक्तीला प्रभावीपणे आधार देतात. ऊर्जा आणि लक्ष केंद्रित करण्यासाठी दररोज काही पदार्थांचा वापर केला जाऊ शकतो.

**धान्य आणि शेंगा**

ओट्स, क्विनोआ आणि मसूर यांसारखे कॉम्प्लेक्स कार्बोहायड्रेट्स असलेले पदार्थ तुम्हाला हळूहळू ऊर्जा देऊ शकतात. त्यामुळे तुमच्या शरीरात साखरेचे प्रमाण वाढणार नाही आणि परिणामी चिडचिड किंवा थकवा येणार नाही. यामध्ये मूड नियंत्रित करणारे व्हिटॅमिन बी देखील भरपूर असते.

उत्तम मानसिक आरोग्यासाठी हे पाच पदार्थ टाळा

**साखरयुक्त स्नॅक्स आणि पेय**

ते रक्तातील साखरेमध्ये जलद वाढ आणि घट निर्माण करतात. त्यामुळे तुमची ऊर्जा पातळी आणि मूड पुन्हा खराब होऊ शकते.

**प्रक्रिया केलेले अन्न**

प्रक्रिया केलेल्या अन्नात ट्रान्स फॅट्स, प्रिझर्व्हेटिव्हज आणि ॲडिटिव्हज जास्त असतात. ते मेंदूच्या रसायनशास्त्रात व्यत्यय आणतात आणि जळजळ वाढवतात.

**जास्त प्रमाणात कॅफिन**

कॅफिनमुळे थोडेसे लक्ष केंद्रित होण्यास मदत होईल, मात्र जास्त कॅफिन चिंता वाढवू शकते आणि झोपेमध्ये व्यत्यय आणू शकते.

**मद्यपान**

नैराश्य देणारे असूनही अल्कोहोल तुम्हाला तात्पुरता आराम देऊ शकते. कारण ते तुमच्या न्यूरोट्रान्समीटरच्या नैसर्गिक संतुलनावर परिणाम करते आणि परिस्थिती आणखी बिकट करते.

आत्मज्ञान : प्राची परचुरे वैद्य



# मोह

माणूस जन्माला आला की त्याचे आयुष्य सुरू होते ते अगदी मरेपर्यंत. त्या आयुष्याच्या प्रवासात अनेक सुखदु:खाचे क्षण येतात. आयुष्याच्या प्रवासात अनेक अडचणी, अडथळे येत असतात. अनेकदा अवघड परिस्थिती निर्माण होते, तेव्हा आपले मन भांबावून जाते. भांबावलेल्या क्षणी मन थाऱ्यावर नसतं. अवघड परिस्थितीतून कसा मार्ग काढावा याचाच सतत विचार सुरू होतो. अवघड परिस्थिती मग ती मानसिक किंवा आर्थिक परिस्थितीची पण असू शकते, अशावेळी मोहाचे क्षणही समोर येतात. मोह म्हणजे भूरळ पाडणारा क्षण.

माणसाला कधी पैशाची, संपत्तीची, सोन्या नाण्याची किंवा प्रसिद्धीचे इ. प्रकारचे अनेक भुरळ घालणारे विचार मनात येतात आणि मग असं वाटायला लागतं की, एकदा प्रयत्न करायला काय हरकत आहे असे आपले मन आपल्याला सांगू लागतं आणि नकळत आपण मोहाच्या जाळ्यात सापडतो. अशा वागणुकीमुळे आपण कधी त्या मोहाच्या जाळ्यात अडकतो तेच आपल्याला समजत नाही. आपण एवढे त्यात गुंतत जातो की, आता कुठे थांबावं हेच कळत नाही. मन आणि बुद्धी त्या क्षणी दोन्हीही हतबल होते.

खरे तर परिस्थितीने आपल्याला ती वाट दाखवलेली असते; परंतु आता या मोहापासून कसे दूर जावे तेच कळत नाही. पण यातूनच खोटे बोलणे, फसवणूक करणे, लबाडी करणे, गंडा घालणे इ. सारखे गुन्हे घडण्यास सुरुवात होते.

मोहमायेच्या खेळात सारेच जण अडकले आहेत. पण हे सारं काही खोटं आहे.

आपल्याला माहीत आहे की जे आपण मिळवत आहोत किंवा मिळवणार आहोत हे सर्व नश्वर आहे. सकाळपासून रात्रीपर्यंत मनुष्य सुखाच्या शोधात आहे. नोकरी, संसार या सर्व गोष्टींमध्ये गुरफटून गेला आहे. पण या सर्वांचा विचार करायला त्याच्याजवळ वेळ कुठे? सारं काही इथेच ठेवून जायचं आहे. काही सोबत घेऊन जाता येणार नाही हे माहीत असून सुद्धा मोह काही सुटता सुटत नाही. या मोहमायेमुळे मोक्ष मिळत नाही. मन कायम अतृप्त इच्छा, भावना घेऊन जगत असतं आणि एके दिवशी अचानक मरण पावतो; परंतु सतत मोहमायात अडकल्याने मृत्यूनंतरचा प्रवासही सुखकर होत नाही. ८४ लक्ष योनीच्या फेऱ्यात पुन्हा पुन्हा तो जीव अडकत जन्म घेतच राहतो.

मागच्या जन्माचे हिशोब चुकते करता करता पुन्हा नवीन मोहाच्या पाशात अडकून पडतो. हे चक्र थांबत नाही. अविरत चालूच राहते. हे घडते ते फक्त मोहामुळे, मनाला आवर न घालता आल्यामुळे. त्यामुळे प्रत्येक कृती करताना पूर्ण विचारांती करावी किंवा घरातील ज्येष्ठांना विचारात घ्यावे किंवा चांगल्या मित्र-मैत्रिणींचा सल्ला घ्यावा. घरात चर्चा करावी आणि सर्वांच्या विचारांती निर्णय घ्यावा.

# चिकन वडा पाव



साहित्य :

२५० ग्रॅम बोनलेस चिकन खिमा १ टेबलस्पून आलं-लसूण पेस्ट १ लहान कांदा बारीक चिरलेला १ टेबलस्पून कसुरी मेथी २-३ टेबलस्पून चिरलेली कोथिंबीर १ टेबलस्पून धने पावडर १/२ टेबलस्पून लाल तिखट १ टेबलस्पून एव्हरेस्ट चिकन मसाला १ टीस्पून गरम मसाला चवीप्रमाणे मीठ १ कप बेसन पीठ १ टीस्पून लाल तिखट १/४ टीस्पून हळद १ टीस्पून ओवा चवीप्रमाणे मीठ लागले तेवढे पाणी तळण्यासाठी तेल हिरव्या चटणीसाठी कोथिंबीर, पुदिना हिरवी मिरची, लसूण, लिंबू, मीठ टोमॅटो सॉस किंवा केचप लादी पाव

कृती :

प्रथम बेसन पीठ भिजवून घ्यावे. एका बाऊलमध्ये बेसन पीठ घेऊन, त्यात हळद, लाल तिखट, मीठ, हातावर चोळून ओवा घालावा. सर्व कोरडं मिश्रण व्यवस्थित मिक्स करून घ्या. थोडे थोडे पाणी घालत, वड्याला जसे पीठ भिजवतो तसे भिजवून घ्या. चिकन खिमा एका बाऊलमध्ये घेऊन त्यात आलं लसूण पेस्ट,धने पावडर, लाल तिखट, गरम मसाला, चिकन मसाला, कसुरी मेथी, चवीप्रमाणे मीठ, बारीक चिरलेला कांदा, कोथिंबीर सर्व घालून घ्या. मिश्रण व्यवस्थित मिक्स करून घेणे त्याचे छोटे छोटे गोळे करून घ्या. कोथिंबीर, पुदिना, हिरवी मिरची, लसूण, लिंबू व मीठ, पाणी घालून हिरवी चटणी वाटून घ्या. कढईत वडे तळता येतील इतकं तेल घेऊन गॅसवर गरम करायला ठेवून द्या. बेसन पीठ हाताने व्यवस्थित फेटून घ्या. चिकनचा गोळा घेऊन पिठात घोळवून, तेलामध्ये सोडा. दोन्ही बाजूने लालसर होतील असे, मध्यम आचेवर वडे तळून घेणे. लादी पाव घेऊन सुरीने मधोमध कापून घेणे. पावाच्या एका बाजूला हिरवी चटणी आणि दुसऱ्या बाजूला लाल चटणी किंवा केचप लावून घ्या. पावात वडा ठेवून गरमागरम खायला द्या.



# सहकारातील घोटाळे

सहकारी संस्थांमधील घोटाळे ही एक गंभीर समस्या असून, यात अनेक प्रकारच्या गैरव्यवहारांचा समावेश आहे, जसे की बळकावलेला निधी, बेकायदेशीर कर्ज वाटप आणि शासकीय जमीन घोटाळे. अलीकडील काही प्रमुख उदाहरणे म्हणजे यशवंत सहकारी बँकेतील सुमारे ११२ कोटींचा घोटाळा आणि मराठवाड्यातील विविध पतसंस्थांमधील हजारो कोटींचा घोटाळा.

सहकारासाठी प्रसिद्ध असणाऱ्या पश्चिम महाराष्ट्रात सध्या बँकेतील घोटाळे उघड होण्याचे दिवस आहेत. सांगलीत भाजपचे माजी मंत्री सदाभाऊ खोत आणि आमदार गोपीचंद पडळकर यांच्या तक्रारीवरून जयंत पाटील यांच्या नेतृत्वाखालील सर्वपक्षीय जिल्हा मध्यवर्ती बँकेतील संचालक मंडळाला ५५९ जागांवर नोकर भरती करण्यास स्थगिती दिली आहे. त्यापूर्वीच्या प्रकरणांची चौकशी सुरू आहे ती वेगळीच. कोल्हापुरातील वारणेच्या प्रकरणात चौकशी सुरू आहे. एकूणच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तोंडावर दक्षिण महाराष्ट्रात सहकारातील घोटाळे उघड होऊ लागले आहेत. पण, यातून खरेच काही उघडकीस येणार की अंडरस्टँडिंग होणार याकडे दक्षिण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. जयंत पाटील आणि गोपीचंद पडळकर हा वाद सध्या राज्यभर चर्चेत आहे. त्यात सांगलीत झालेल्या संस्कृती मेळाव्यात राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या काही अतिउत्साही लोकांनी सदाभाऊ खोत यांच्या मातोश्रींबाबत अपशब्द काढले शिवाय मुख्यमंत्र्यांच्या परिवाराबद्दलही वाईट वक्तव्य केली. त्यानंतर भाजपने संताप व्यक्त केला. मिळालेल्या माहितीनुसार जयंत पाटील यांच्याकडून याबद्दल भाजपच्या वरिष्ठ पातळीवर सारवासारव करण्यात आली. नंतर गोपीचंद पडळकर यांनी आपण यापुढे जयंत पाटील यांच्याविषयी बोलणार नाही असे जाहीर केले. त्यातून संधी साधत जयंत पाटील यांनी योग्य वेळी आपण सर्वांना ठोकून काढणार असे जाहीर केले. त्यामुळे पुन्हा कलगीतुरा रंगला आहे. त्यातच अजित पवार गटाचे असलेले राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी जयंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला नोकर भरती करण्यासाठी परवानगी दिली. त्यामुळे संतापलेल्या सदाभाऊ खोत यांनी सहकार मंत्र्यांच्या विरोधात टोकाची भूमिका घेऊन त्यांची मुख्यमंत्र्यांकडे तक्रार केली. आधीची नोकर भरती वादग्रस्त असताना आणि त्याच्यावर आरोपांसह इतर व्यवहारांची चौकशी सुरू असताना सहकारमंत्र्यांनीही यात वाटा उचलला आहे असा खोत यांनी घरचा आहेर दिला. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी मग खुलासे करत ही परवानगी राज्याच्या सहकार आयुक्तांनी दिली आहे. आपण नाही असे सांगून अंग काढण्याचा प्रयत्न केला. वास्तविक या प्रकरणातील सगळेच राजकारण उघड आहे. पूर्वाश्रमीचे काँग्रेस आणि राष्ट्रवादीचे नेते भाजप आणि अजित पवारांच्या गटात सुद्धा सामील असल्याने एकमेकाला सांभाळून घेण्याच्या राजकारणात ते माहीर आहेत. त्याचा सर्वाधिक परिणाम दक्षिण महाराष्ट्रावर होतो. या प्रकरणी खोत यांच्या तक्रारीनंतर मुख्यमंत्र्यांनी लक्ष घातल्याने नोकर भरतीला स्थगिती देण्यात आली आहे. आता ही नोकर भरती टीसीएस किंवा शासकीय यंत्रणेमार्फत तटस्थपणे होईल. परिणामी एकेका जागेसाठी होणारी लाखो रुपयांची बोली लागणार नाही. अनेकांनी या जागी आपले लोक घेतले जावेत म्हणून संचालकांकडून जागा आरक्षित केल्याचे आणि त्यासाठी काही आर्थिक व्यवहारांची चर्चाही झाल्याचे सांगितले जात आहे.

अशा स्थितीत भाजप सरकारने दिलेला हा दणका सत्ताधारी पक्षातील मंडळींना सुद्धा खट्टू करून गेला आहे. त्यामुळे भविष्यात स्वतःला विस्थापित म्हणणाऱ्या खोत आणि पडळकर यांना प्रस्थापित म्हणून हे नेते स्वीकारतील का? आणि त्यांच्या पंगतीत बसल्यानंतर या नेत्यांची तक्रार बंद होईल का? याबद्दल आता चर्चा सुरू झाली आहे. ती काही असली तरी सांगलीच्या सहकाराला आणि जयंत पाटलांचे नेतृत्वाला यामुळे जबरदस्त तडाखा बसला आहे. आता जर हे नेते तडजोडीला आले तर दक्षिण महाराष्ट्राचे चित्र बदललेले दिसून येईल.

कोल्हापूर जिल्ह्यात सहकारातील घोटाळे तुलनेने कमी समोर येत असले तरी, सातारा-सांगलीतील घडामोडींचा परिणाम इथेही दिसतो आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत गेल्या वर्षी (२०२४) काही बोगस कर्ज वितरणाच्या तक्रारी नोंदवल्या गेल्या होत्या, ज्यात स्थानिक नेत्यांचे नातेवाईक सामील असल्याचा संशय होता. विशेषतः वारणा सहकारी साखर कारखान्याशी जोडलेल्या बँकांमध्ये थकबाकी वसुलीतील अनियमिततेच्या आरोपांनी वातावरण ढवळून निघाले आहे. एका अहवालानुसार, कोल्हापूर जिल्ह्यातील नागरी सहकारी बँक असोसिएशनमध्ये २०२४-२५ मध्ये लेखापरीक्षणादरम्यान ५० कोटी रुपयांहून अधिकच्या बोगस कर्जांची बाब समोर आली, ज्यात संचालक मंडळाने बनावट दस्तऐवज तयार केल्याचा आरोप आहे. यामध्ये स्थानिक भाजप आणि राष्ट्रवादी नेत्यांचे कार्यकर्ते सामील असल्याने राजकीय वाद पेटला. जिल्हा परिषद शिक्षक सहकारी बँकेतही नियमबाह्य भरतीच्या प्रकरणात सोलापूरशी जोडलेल्या संस्थांवर कारवाई झाली असून, कोल्हापूरमध्येही अशीच तक्रार दाखल झाल्याची माहिती आहे. मात्र, भरती प्रक्रिया सुरू असल्याने (जसे की कोल्हापूर जिल्हा नागरी सहकारी बँक असोसिएशनची २० लिपिक भरती), चौकशीला स्थगिती मिळाली आहे. दक्षिण महाराष्ट्रात सहकार हा शेतकऱ्यांना पाठबळ असावा, पण आज तो राजकीय हत्यार बनला आहे. शेतकरी आणि ठेवीदारांच्या हितासाठी सहकार विभागाने तातडीने सुधारणा करणे गरजेचे आहे. अन्यथा, ही क्रेझ संपूर्ण महाराष्ट्रात पसरेल आणि सहकाराची प्रतिमा धुळीला मिळेल.

## सखी : मासिक पाळी

## डॉक्टर टीप्स



खरंतर ही अत्यंत सकारात्मक बाब आहे, असे मला वाटते. सध्या अनेक सामाजिक संस्थांनी मासिक पाळीविषयी जनजागृती करण्यासाठी पुढाकार घेतल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे मासिक पाळीविषयीचे समाजातील गैरसमज दूर होत आहेत.

**–नितेश गावकर, कल्याण**

मासिक पाळी हा महिलांच्या आयुष्यातील नैसर्गिक भाग आहे. मासिक पाळी हे निसर्गाने महिलांना दिलेले एक वरदान आहे. इंटरनेटमुळे मासिक पाळीविषयीची माहिती सध्याच्या काळात सहज उपलब्ध आहे. त्याचबरोबर जाहिराती आणि चित्रपटामुळे मासिक पाळीविषयीची जनजागृती होत आहे. त्यामुळे समाजात मासिक पाळीविषयीच्या विचारांमध्ये बदल होताना दिसून येत आहेत. केवळ इतकेच पुरेसे नसून पालकांनीही घरातील लहान मुलींसोबत याविषयी अधिक संवाद साधणे गरजेचे आहे.

## विनोद




**गुरूजी : सांग असत्यवादी मोठा की सत्यवादी?**

**शिष्य : असत्यवादी.**

**गुरूजी : काहीतरी भलतंच कसं काय?**

**शिष्य : सत्यवादी चार अक्षरी शब्द आहे. असत्यवादी एका अक्षराने मोठा आहे.**

## संदेश

Doctor: aapke pati ko zyaada rest ki zaroorat hai. yeh sleeping tablets leejiye.

Wife: unko yeh kab dena hai doctor?

Doctor: yeh unke liye nahi, aapke liye hai

## सुविचार



**माझे ते खरे म्हणण्यापेक्षा खरे ते माझे म्हणा.**

**– अज्ञात**


**संस्कृत सुभाषित**

**अतिक्रान्तं हि यत्कार्यं पश्चाचिंतयते नर:**
**तच्चास्य न भवेत्कार्यं चिंतया च विनश्यति**
**(कर्णपर्व, अध्याय ३१, ‍ेक २९ महाभारत)**

**अर्थ :** घटना घडून गेल्यानंतर मागाहून जो चिंता करीत बसतो, त्याचे कार्य तर होत नाहीच, पण चिंतेने नाश मात्र होतो.

# मनोरंजक महाशब्दकोडे

कोड क्र. १०



## आडवे शब्द

१. '---- मोरया, मंगलमूर्ती श्री गणराया' (लता मंगेशकर)
१०. मासा पकडण्याचे साधन
११. किंमत
१२. अभिनव
१४. एक रंगीत कंदमूळ
१५. दणकट, मजबूत
१७. विद्युल्लता
१८. पुळका, गहिवर, मूळ अर्थ झरा
१९. पुष्पदल
२१. रसाळ
२३. नवरा, पती
२५. सीतेच्या जुळ्या मुलातील एक
२६. काव, तांबडी माती
२८. सारखा
३१. एक छोटे चर्मवाद्य
३३. रणक्षेत्र
३६. अंत:करण
३८. पुष्कळ
४०. चित्रपटाचे संवाद
४१. पाठविलेला
४२. कलावंत
४५. शरीर
४६. आरोप
४७. निष्ठूर, दया नसलेला
४९. सबब
५०. पू.विनोबाजींनी लिहिलेले गीतेचे मराठी अनुवादित ‍ेक
५२. सावली, प्रतिबिंब
५३. तात्पर्य
५६. एक श्वासरोग
५७. अजगर
५८. तंतोतंत जुळणारे
६०. आपला-परका अशी भावना
६३. दृष्टी, दृष्ट
६५. अति उंचीची दोन झाडे
६७. अटीची भाषा
६९. मुस्लिम प्रार्थना पद्धत
७१. पत्र
७३. लोकर, लव (इंग्रजी)
७४. शिजविलेले तांदूळ
७५. नूतन
७७. मस्ती, जोम
७८. घरोघरी पूर्वी मातीच्या असायच्या
८०. अर्धी ओंजळ
८२. सुका, वाळलेला
८४. न घडवलेले, न रूळलेले
८५. कहाणीतील गाव
८६. गुरांचे खाद्य

## उभे शब्द

१. ऐटदार चालीची स्त्री
२. पोलिस
३. गर्भाचे पोषण करणारी
४. तारण
५. मीठ
६. विधानसभेचा सदस्य
७. नमनीय
८. खूप लांब (अंतरावर)
९. जनतेचा कल आणि कौल
१३. खस
१५. फुलाची प्रथमावस्था
१६. कोवळ्या दुधाचा पदार्थ
१८. पार्वतीला शंकराने दिलेले नाव
२०. उन्हाचे तुकडे
२२. लाकडी जिना
२४. कोळिष्टक
२७. आईची वहीनी
२९. झकास
३०. अनुमती
३२. सडेतोड बोलणारा
३४. सुसर
३५. मुक्या प्राण्यांवरील प्रेम
३७. नकला करणारा
३८. रामबंधु
३९. मज्जाव, बंदी
४०. पाडाव, ऱ्हास
४३. कपडालत्ता
४४. हे दिवस ऋण काढून साजरे करू नयेत
४६. जननी, जन्म देणारी
४७. कीव, करुणा
४८. अत्यंत खालच्या दर्जाचा
५१. दिनांक
५३. वस्तू, माल
५४. ओंल, बीभत्य- ---- विचकट
५५. धन्यवादाचा शब्द
५७. नाविक दल
५९. वेल
६०. आमचा (बंगाली)
६१. चित्रपट
६२. मायभूमी, जमीन
६४. लोक, प्रजा
६६. छोटा डफ
६८. रविवासर
७०. जगन्माता
७२. पवित्र, शुद्ध
७६. तोटी
७८. उजेडासाठी पेटवलेली गवत इ.ची जुडी
७९. स्तुती करणारा
८१. लहान
८३. कावळा

## आडवे उत्तर

१.गजानना श्री गणराया आधी वंदू तुज १०.गळ ११.दर १२.नवा १४.गाजर १५.कणखर १७.दामिनी १८.उमाळा १९.पाकळी २१.रसदार २३.यजमान २५.लव २६.काव २८.सम ३१.डफ ३३.समरभूमी ३६.मन ३८.भरमसाट ४०.पटकथा ४१.रवाना ४२.कलाकार ४५.तन ४६.आळ ४७.दयाहीन ४९.कारण ५०.गीताई ५२.पडछाया ५३.सार ५६.दमा ५७.आर ५८.चपखल ६०.आपपरभाव ६३.नजर ६५.ताडमाड ६७.जरतर ६९.नमाज ७१.टपाल ७३.फर ७४.भात ७५.नवीन ७७.रग ७८.चुली ८०.पसा ८२.वाळका ८४.अनघड ८५.आटपाटनगर ८६.कडबा

## उभे उत्तर

१.गजगामिनी २.नगरपाल ३.नाळ ४.गहाण ५.रामरस ६.आमदार ७.वंदनीय ८.दूर ९.जनमानस १३.वाळा १५.कळी १६.खरवस १८.उमा २०.कवडसा २२.दादर २४.जळमट २७.मामी २९.मस्त ३०.पवानगी ३२.फटकळ ३४.मगर ३५.भूतदया ३७.नकलाकार ३८.भरत ३९.मना ४०.पतन ४३.कापडचोपड ४४.सणवार ४६.आई ४७.दया ४८.हीन ५१.तारीख ५३.सामान सामान ५४.अचकट ५५.आभार ५७.आरमार ५९.लता ६०.आमार ६१.रजतपट ६२.वतन ६४.जन ६६.डफली ६८.रविवार ७०.जगदंबा ७२.पावन ७६.नळ ७८.चुड ७९.भाट ८१.सान ८३.काक



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### पाकिस्तानची घरच्या मैदानावर नाचक्की; चक्क१६ धावांत गमावल्या ५ विकेट

लाहोर-टी-२० आंतरराष्ट्रीय हंगामातील एका निराशाजनक कामगिरीनंतर, पाकिस्तान क्रिकेट संघ आता कसोटी क्रिकेटच्या मैदानावर परतला आहे. संघ घरच्या मैदानावर खेळत आहे, पण तो अजूनही वाईट स्थितीत आहे. फक्त दोन फलंदाजांनी चांगली फलंदाजी केली, पण त्यांनाही सात धावांनी महत्त्वाचा टप्पा गाठण्यात अपयश आले. संघ सध्या अनिश्चित स्थितीत आहे आणि येत्या काळात त्यांना पुन्हा एकदा पुनरागमन करावे लागेल.



पाकिस्तान आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील कसोटी मालिका सुरु : पाकिस्तानी संघानं १२ ऑक्टोबर रोजी जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या पुढील फेरीला सुरुवात केली. दक्षिण आफ्रिका सध्या पाकिस्तान दौऱ्यावर आहे, जिथं दोन कसोटी सामन्यांची मालिका खेळवली जात आहे. मालिकेचा पहिला सामना लाहोरच्या गद्दाफी स्टेडियमवर खेळला जात आहे. प्रथम फलंदाजी करताना शान मसूदच्या नेतृत्वाखालील पाकिस्तानी क्रिकेट संघानं ३७८ धावा केल्या. सलामीवीर इमाम-उल-हकनं ९३ धावा केल्या पण त्याचं शतक सात धावांनी हुकलं. त्यानंतर सलमान अली आघा यांनी ९३ धावा केल्या आणि बाद झाला. तोही शतकापासून फक्त सात धावांनी कमी पडून पॅव्हेलियनमध्ये परतला. कर्णधार शान मसूदनं ७६ धावांची खेळी केली.

***

### भारताला शेवटच्या दिवशी जिंकण्यासाठी हव्या ५८ धावा

नवी दिल्ली-भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडियममध्ये कसोटी सामना सुरू आहे. या सामन्यात जिंकण्यासाठी भारताला शेवटच्या दिवशी ५८ धावांची आवश्यकता आहे. याआधी नाणेफेक जिंकून भारताने फलंदाजीचा निर्णय घेतला आणि पहिल्या डावात पाच बाद ५१८ धावा केल्या. यानंतर भारताने डाव घोषीत केला. नंतर वेस्ट इंडिजने पहिल्या डावात सर्वबाद २४८ धावा केल्या. भारताने फॉलोऑन दिल्यामुळे सलग दुसऱ्यांदा फलंदाजीसाठी आलेल्या विंडीजने नंतरच्या डावात सर्वबाद ३९० धावा केल्या आणि भार-तापुढे जिंकण्यासाठी १२१ धावांचे आव्हान ठेवले.दिल्ली कसोटी सामन्याच्या चौथ्या दिवशी भारत शेवटच्या डावाची फलंदाजी करण्यासाठी मैदानात आला. यशस्वी जयस्वाल आठ धावा करुन वॉरिकनच्या चेंडूवर अँडरसनकडे झेल देऊन परतला. केएल राहुल २५ आणि साई सुदर्शन ३० धावांवर खेळत आहे. आतापर्यंत भारताने एक बाद ६३ धावा केल्या आहेत. सामन्याच्या शेवटच्या दिवशी जिंकण्यासाठी भारताला ५८ धावांची आवश्यकता आहे. भारताने सहा पैकी तीन कसोटी सामने जिंकले आहेत. भारताचा दोन कसोटी सामन्यात पराभव झाला आहे आणि एक सामना अनिर्णित राहिला आहे. भारताने ४० गुण मिळवले आहेत.



***

### दुबईनंतर आता लाहोरमध्ये घुसून मारले, काही समजायच्या आतच ऑलआऊट!

लाहोर-दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या टेस्टमध्ये पाकिस्तानचा ३७८ रनवर ऑलआऊट झाला आहे. दक्षिण आफ्रिकेचा स्पिनर सेनुरन मुथुसामीने पाकिस्तानच्या अर्ध्यापेक्षा जास्त विकेट घेतल्या. ११७ रन देऊन मुथ-ुसामीने ६ विकेट मिळवल्या, ही त्याची टेस्ट क्रिकेटमधली ही सर्वोत्तम कामगिरी आहे. मुथ-ुसामीने ४ बॉलमध्ये पाकिस्तानच्या ३ खेळाडूंना पॅव्हेलियनमध्ये पाठवलं.दक्षिण आफ्रिकेचा डावखुरा स्पिनर मुथुसामीने एकाच ओव्हरमध्ये ३ विकेट घेतल्यामुळे पाकिस्तानची अवस्था ३६२-५ वरून ३६२-८ अशी झाली. ९ ओव्हरनंतर सलामन आघा ९३ रनवर आऊट झाला, यानंतर पाकिस्तानचा डाव ३७८ रनवर संपुष्टात आला, म्हणजेच पाकिस्तानने १६ रनवरच शेवटच्या ५ विकेट गमावल्या. पाकिस्तानचा ओपनर इमाम-उल-हकही पहिल्या दिवशी ९३ रनवरच आऊट झाला होता. इमाम-उल-हकने कर्णधार शान मसूदसोबत (७६ रन) १६१ रनची पार्टनरशीप केली.पाकिस्तानने दुसऱ्या दिवसाची सुरूवात ३१३ रनवर केली होती, तेव्हा मोहम्मद रिझवान ७५ रनवर खेळत होता. रिझवान आणि आगा यांच्यात १६३ रनची पार्टनरशीप झाली. याचसोबत पाकिस्तानने सहाव्या विकेटसाठी टेस्ट क्रिकेटमधली त्यांची सर्वोत्तम पार्टनरशीप केली. मुथुसामीनेने मग नोमानला बोल्ड केलं. आणि



## सामना जिंकला पण विजय साजरा करताना मैदानावरच हृदयविकाराने...

मुरादाबाद: क्रिकेट खेळताना हृदयविकाराच्या झटक्याने निधन होण्याच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहे. टी-२० क्रिकेटमध्ये सामना जिंकल्यानंतर सेलिब्रेशन करताना एका क्रिकेटपटूचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याची घटना उत्तर प्रदेशातील मुरादाबादमध्ये घडली आहे. संघाच्या कर्णधाराने सीपीआर देऊन त्याचा जीव वाचवण्याचा प्रयत्न केला, पण त्याच्या प्रयत्नांना यश मिळालं नाही. रविवारी (१२ ऑक्टोबर) मुरादाबादमध्ये यूपी व्हेटरन्स क्रिकेट असोसिएशनकडून टी-२० क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत मुरादाबाद आणि संभल या दोन्ही संघांमध्ये सामना



सुरू होता. या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजीसाठी आलेल्या मुरादाबाद संघाने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांअखेर ९ गडी बाद १३४ धावा केल्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या संभल संघाला २० षटकांअखेर ६ गडी बाद १२१ धावांपर्यंत मजल मारता आली. मुरादाबाद संघाकडून शेवटचे षटक टाकण्यासाठी अहमर खान गोलंदाजीला आला. शेवटच्या षटकात आपल्या संघाला विजय मिळताच अहमर खानने हात वर करून जल्लोष केला. पण इतक्यात तो जमिनीवर पडला. संघातील खेळाडूंनी त्याला सीपीआर दिला. पण सीपीआर देऊनही कुठलीही हालचाल न जाणवल्याने त्याला तातडीने जवळच्या रूग्णालयात घेऊन जाण्यात आलं. त्यावेळी डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केलं. क्रिकेटच्या मैदानावर विजय मिळवल्यानंतर जल्लोष करणारा अहमर खान आयुष्याच्या शर्यतीत मात्र हरला. अहमर खानचं हृदयविकाराच्या झटक्याने निधन झालं आहे, ही बातमी वाऱ्याच्या वेगाने पसरली. पण या गोष्टीवर कोणाचा विश्वासच बसत नव्हता. अहमर खान हा माजी भारतीय खेळाडू पियूष चावलासोबत लोकल क्रिकेटमध्ये बरेच सामने खेळला होता. अहमर खान हा मुराबादमध्ये खूप प्रसिद्ध होता. बऱ्याच वर्षांपासून तो त मुरादाबादकडून माजी खेळाडूंच्या क्रिकेट स्पर्धेत सहभाग घेत होता. तो आपल्या मैदानावर आपल्या खिलाडूवृत्तीसाठी आणि मैदानाबाहेर आपल्या चांगल्या स्वभावासाठी प्रसिद्ध होता. ही घटना अतिशय दुखद असल्याचं स्पर्धेच्या आयोजकांनी सांगितलं.

### पाकिस्तानात खरे बोलणे महागात पडले! अरशद नदीमच्या प्रशिक्षकावर आजीवन बंदीची कारवाई, नेमके प्रकरण काय?

मुंबई-ऑलम्पिकमध्ये पाकिस्तानला भालाफेकमध्ये गोल्ड मेडल जिंकवून देणाऱ्या अरशद नदीमचे कोच सलमान इकबाल यांच्यावर रविवारी आजीवन बंदीची कारवाई करण्यात आली. एथलेटिक्स महासंघाने पंजाब एथलेटिक्स संघाच्या संविधानाचे उल्लंघन केल्याचे आरोपाखाली त्यांच्यावर बंदीची कारवाई केली आहे. कोच सलमान इकबाल हे पंजाब एथलेटिक्स संघाचे अध्यक्ष होते. आजीवन बंदी अंतर्गत, इक्बाल कोणत्याही ॲथलेटिक्स गतिविधित भाग घेऊ शकत नाही, कोणत्याही स्तरावर प्रशिक्षक किंवा कोणतेही पद भूषवू शकत नाही.

**नेमके काय घडले?**

पाकिस्तान ॲमेच्योर ॲथलेटिक्स फेडरेशनने इक्बालवर ऑगस्टमध्ये झालेल्या पंजाब असोसिएशनच्या निवडणुकांचे उल्लंघन केल्याचा आरोप केला आहे. सप्टेंबरमध्ये एक चौकशी समिती स्थापन करण्यात आली आणि त्यांनी पाकिस्तान क्रीडा मंडळाला (पीएसबी) दिलेल्या उत्तराच्या एक दिवसानंतर, १० ऑक्टोबर रोजी इक्बालवर बंदी घालण्याची शिफारस केली.टोकियो येथील वर्ल्ड ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये नदीमच्या खराब कामगिरीबद्दल स्पष्टीकरण मागण्यासाठी इक्बालने पीएसबीला पाठवलेल्या अलिकडच्या उत्तरामुळे हा निर्णय घेतला गेल्याचे बोलले जात आहे. वर्ल्ड ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये अरशद नदीमची कामगिरी निराशाजनक राहिली. त्यानंतर पाकिस्तानी स्पोर्ट्स स्पोर्ट्स बोर्डाने प्रशिक्षक सलमान इकबालकडे याबाबत स्पष्टीकरण मागितले. यावेळी उत्तरात सलमान इकबाल यांनी पीएसबी ला धक्कादायक माहिती दिली होती.खरे बोलणे पडले महागात : दिलेल्या उत्तरात कोच सलमान इकबाल यांनी म्हटले की, मागील वर्षांपासून इअअइ कडून अरशद नदीमच्या प्रशिक्षण आणि क्रिडा सुविधांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले होते.

## टीम इंडियाकडे अजूनही सेमीफायनलमध्ये जाण्याची संधी! कसं आहे समीकरण?

**नवी दिल्ली:** आयसीसी महिला वनडे वर्ल्डकप २०२५ स्पर्धेत भारतीय संघाचं सेमीफायनलमध्ये जाण्यासाठी कसं आहे समीकरण? जाणून घ्या.आयसीसी महिला वनडे वर्ल्डकप २०२५ स्पर्धेत भारत आणि ऑस्ट्रेलिया या दोन्ही संघांमध्ये अटीतटीचा सामना रंगला. शेवटच्या षटकात ऑस्ट्रेलियाने बाजी मारून भारतावर ३ गडी राखून विजय मिळवला. या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजीसाठी आलेल्या भारतीय संघाने ३३० धावा केल्या होत्या. ३३१ धावांचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियन फलंदाजांनी शेवटच्या षटकात षटकार मारून विजयाची नोंद केली. सेमीफायनलमध्ये जाण्यासाठी भारतीय संघाला हा सामना जिंकणं महत्वाचं होतं. पण हा सामना गमावल्यामुळे भारतीय संघाचं टेन्शन वाढलं आहे. दरम्यान आता सेमीफायनलमध्ये जाण्यासाठी भारतीय संघासाठी कसं आहे समीकरण? समजून घ्या.



भारतीय संघ गुणतालिकेत कितव्या स्थानी? आयसीसी महिला वनडे वर्ल्डकप २०२५ स्पर्धेत भारतीय संघाने आतापर्यंत ४ सामने खेळले आहेत. यापैकी २ सामन्यांमध्ये भारताला विजय मिळवता आला आहे. तर २ सामन्यांमध्ये भारतीय संघाला पराभवाचा सामना करावा लागला आहे. ४ गुणांसह भारतीय संघ गुणतालिकेत तिसऱ्या स्थानी कायम आहे. भारतीय संघाचा नेट रनरेट हा +०.६७२ इतका आहे. भारतीय संघ इथून पुढे आणखी ३ सामने खेळण्यासाठी मैदानात उतरणार आहे. भारताचे पुढील सामने इंग्लंड, न्यूझीलंड आणि बांगलादेशविरूद्ध होणार आहे. भारतीय संघाला हे पुढील तिन्ही सामने मोठ्या फरकाने जिंकावे लागणार आहेत. असं झाल्यास, भारतीय संघ १० गुणांपर्यंत पोहोचू शकतो. यासह भारतीय संघाच्या नेट रनरेटमध्येही आणखी भर पडू शकते. पण जर भारतीय संघाने ३ पैकी २ सामने जिंकले आणि १ सामना गमावला, तर भारतीय संघाच्या अडचणीत वाढ होऊ शकते. भारतासाठी सेमीफायनलमध्ये जाण्याचा मार्ग मोकळा असेल, पण भारतीय संघाला इतर संघांच्या निकालावर अवलंबून राहावं लागेल.फ्लाईग जेमिमा! हवेत डाईव्ह मारून घेतला वर्ल्डकप स्पर्धेतील सर्वोत्तम झेल, पाहा तखऊएज गुणतालिकेत ऑस्ट्रेलियाचा संघ अव्वल स्थानी आहे. ऑस्ट्रेलियाने ४ सामने खेळले आहेत. या संघाने ४ पैकी ३ सामने जिंकले आहेत. तर १ सामना अनिर्णित राहिला आहे. ऑस्ट्रेलियाने आतापर्यंत ७ गुणांची कमाई केली आहे. तर ३ पैकी ३ सामने जिंकून इंग्लंडचा संघ दुसऱ्या स्थानी आहे.

## एक-दोन-तीन... पोरीने कानाखाली मारल्या, इंडिया - वेस्ट च्या लाईव्ह सामन्यात मैदानात काय घडले?

दिल्ली,-भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात दुसरा कसोटी सामना दिल्लीत खेळला जात आहे. चौथ्या दिवशी अरुण जेटली स्टेडियमवर घडलेल्या एका घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये एक मुलगी स्टँडमध्ये बसलेल्या एका मुलाला एकदा नाही तर तब्बल तीन-चार वेळा कानाखाली मारताना दिसत आहे. आजूबाजूचे प्रेक्षक आश्चर्यचकित झाले, तर काहींनी हा प्रसंग मोबाईलमध्ये टिपला. ही घटना वेस्ट इंडिजच्या दुसऱ्या डावातील ८९व्या षटकानंतर घडली. पण त्यांची मस्ती चालू होती. दरम्यान, हा व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होतं आहे.दुसरीकडे सामन्याबद्दल बोलायचे झाले तर, वेस्टइंडिज क्रिकेट संघाने भारताविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीत जबरदस्त पुनरागमन केले. पहिल्या डावात खराब कामगिरी केल्यानंतर वेस्टइंडिजने दुसऱ्या डावात अशी झुंज दिली की टीम इंडियाच्या खेळाडूंच्या चेहऱ्यावर चिंता स्पष्ट दिसू लागली. सामना कोण जिंकेल हे अजून सांगता येणार नाही, पण वेस्टइंडिजने ते करून दाखवले आहे जे त्यांनी गेल्या १२ वर्षात कसोटीत केले नव्हते.



कसोटीत जेव्हा एखाद्या संघाला फॉलोऑनचा सामना करावा लागतो, तेव्हा बहुतांश वेळा तो सामना डावाने हरावा लागतो. सलग दोनदा फलंदाजी करणे सोपे नसते. वेस्टइंडिजलाही याच परिस्थितीचा सामना करावा लागला होता. शेवटचं असं २०१३ साली झालं होतं, जेव्हा न्यूझीलंडविरुद्ध फॉलोऑन मिळाल्यानंतर त्यांनी सामना डावाने न हरता ड्रॉ केला होता. त्यानंतर तब्बल १२ वर्षांनी पुन्हा एकदा त्यांनी असा दिवस पाहिला आहे. जॉन कॅम्पबेल आणि शाई होपचा धमाका

भारतीय संघाने पहिल्या डावात ५ गडी गमावून ५१८ धावा करत डाव घोषित केला. त्यानंतर वेस्टइंडिजची पहिली खेळी २४८ धावांवर संपली. कर्णधार शुभमन गिलने पुन्हा फलंदाजी न करता वेस्टइंडिजला फॉलोऑन दिला. जरी दोन गडी लवकर गमावले गेले असले तरी जॉन कॅम्पबेल आणि शाई होपने पुनरागमन केले. कॅम्पबेलने आपले पहिले कसोटी शतक झळकावले, तर शाई होपने कारकिर्दीतील तिसरे शतक पूर्ण केले. दुसऱ्या डावात वेस्टइंडिजने २७० धावा गाठताच त्यांनी भारताचा स्कोर बरोबरीत आणला. आणखी एक धाव मिळताच वेस्टइंडिजने आघाडी घेतली आणि याच क्षणापासून निश्चित झालं की ते आता हा सामना डावाने हरणार नाहीत. तरीही सामना अजून पूर्ण व्हायचा आहे, आणि अखेरचा दिवस बाकी असल्याने काहीही घडू शकतं.

### कुलदीप यादवने दिल्लीमध्ये केले नकोते शतक, बनवला हा खराब रेकॉर्ड

नवी दिल्ली-भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील दुसऱ्या कसोटी सामन्याच्या चौथ्या दिवशी भारतीय संघाचा चायनामन फिरकी गोलंदाज कुलदीप यादवच्या नावावर एक नकोसा विक्रम (णपुरपींशव ठशलेींव) जमा झाला आहे. आपल्या कसोटी कारकिर्दीत प्रथमच कुलदीपने एका डावात १०० किंवा त्याहून अधिक धावा दिल्या आहेत. दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडियमवर सुरू असलेल्या या सामन्यात वेस्ट इंडिजने मफॉलो-ऑनफ्नंतर (त्रेश्रश्रेु-ेप) दुसऱ्या डावात जबरदस्त फलंदाजी करत भारतीय गोलंदाजांना अक्षरश: थकवले. याच दरम्यान, पहिल्या डावात ५ बळी घेऊन हिरो ठरलेला कुलदीप यादव दुसऱ्या डावात पूर्णपणे निष्प्रभ ठरला.

वेस्ट इंडिजच्या पहिल्या डावात कुलदीप यादवने आपल्या फिरकीची जादू दाखवत ८२ धावांत ५ बळी घेतले होते. हा त्याच्या कसोटी कारकिर्दीतील पाचवा मफाइव्ह विकेट हॉलफ होता. दुसऱ्या डावात कुलदीपची जादू चालली नाही. वेस्ट इंडिजच्या फलंदाजांनी त्याला लक्ष्य केले आणि धावा वसूल केल्या. कुलदीपने २९ षटकांत १०४ धावा खर्च केल्या आणि त्याला फक्त ३ बळी मिळाले.

हा आकडा (१०४ धावा) कुलदीप यादवच्या ९ वर्षांच्या कसोटी कारकिर्दीत एका डावात दिलेली सर्वाधिक धावसंख्या आहे. यापूर्वी त्याला कधीही १०० धावांचा टप्पा पार करावा लागला नव्हता. यापूर्वीचा त्याचा सर्वाधिक धावसंख्या देण्याचा विक्रम ९९ धावांचा (ऑस्ट्रेलियाविरुद्ध सिडनी, २०१९) होता.

## सलग दोन पराभव, सेमीफायनलमध्ये पोहोचण्यासाठी टीम इंडियाला काय करावे लागणार?

दिल्ली-आयसीसी महिला वर्ल्ड कप २०२५ यंदा भारतात होत आहे. यापूर्वी टीम इंडियाच्या महिला संघाला कधीही वर्ल्ड कप ट्रॉफीवर नाव कोरता आले नाही. यंदा भारतात वर्ल्ड कप होत असल्याने टीम इंडियाच्या महिला संघाकडून वर्ल्ड कप विजयाच्या अपेक्षा क्रिकेट प्रेमींनी ठेवल्या आहेत. मात्र अशातच टीम इंडियाला वर्ल्ड कपमध्ये आधी दक्षिण आफ्रिका आणि नंतर ऑस्ट्रेलिया अशा सलग दोन पराभवांमुळे त्यांचे सेमीफायनलमध्ये पोहोचण सुद्धा आता अवघड होण्याच्या मार्गावर आहे. रविवार १२ ऑक्टोबर रोजी ऑस्ट्रेलियाकडून झालेल्या पराभवानंतर आता टीम इंडियाचे सेमी फायनलमध्ये स्थान मिळवण्याचं समीकरण कसं असेल याबाबत जाणून घेऊयात.







ऑस्ट्रेलिया विरुद्ध सलग दुसरा पराभव :
टीम इंडियाने महिला वर्ल्ड कप २०२५ मध्ये आतापर्यंत ४ सामने खेळले असून यातील श्रीलंका आणि पाकिस्तान विरुद्ध सामना त्यांनी जिंकला. मात्र गेल्या आठवड्यात दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया यांच्या विरुद्ध झालेल्या सामन्यात मात्र त्यांचा पराभव झाला. रविवारी टीम इंडियाने ऑस्ट्रेलियाला विजयासाठी ३३१ धावांचे आव्हान दिले होते मात्र तरी सुद्धा टीम इंडिया हा स्कोअर डिफेन्ड करू शकली नाही आणि ऑस्ट्रेलीयाने त्यांच्यावर ३ विकेटने विजय मिळवला.

कसे असणार सेमी फायनलच समीकरण?
टीम इंडियाचा वर्ल्ड कप स्पर्धेत काल सलग दुसरा पराभव झाला असाल तरी देखील सेमीफायनलमध्ये पोहोचण्याच्या आशा अजूनही जिवंत आहेत. टीम इंडियाला सेमी फायनलमध्ये पोहोचायचं असेल तर त्यांना पुढील उर्वरित ३ सामने जिंकावे लागतील. टीम इंडियाचे पुढील तीन सामने हे इंग्लंड, न्यूझीलंड आणि बांगलादेश यांच्या विरुद्ध आहेत. यापैकी इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्या विरुद्धचा सामान टीम इंडियासाठी अटीतटीचा होऊ शकतो. या तीन सामन्यांपैकी भार-ताने एकही सामना गमावला तर त्यांचा सेमीफायनलचा मार्ग कठीण होऊ शकतो.

पॉईंट्स टेबलमध्ये कोण कितव्या स्थानी?
सध्या महिला वर्ल्ड कप २०२५ च्या पॉईंट्स टेबलमध्ये ऑस्ट्रेलियाचा संघ ४ सामने जिंकून ७ पॉईंट्स सह प्रथम स्थानी आहे. त्यांच्या खालोखाल दुसऱ्या क्रमांकावर ६ पॉईंट्स सह इंग्लंडचा संघ आहे. तिसऱ्या क्रमांकावर ४ पॉईंट्स सह टीम इंडिया आहे. चौथ्या स्थानावर दक्षिण आफ्रिका आहे. दक्षिण आफ्रिका ४ पॉईंट्सने टीम इंडियाच्या बरोबरीला असली तरी त्यांचा रनरेट मात्र निगेटिव्हमध्ये आहे.

# राष्ट्रीय परिषदांमुळे संशोधनाला मिळतो सकारात्मक दृष्टिकोन : प्राचार्य डॉ. गव्हाणे

**लातूर/प्रतिनिधी :** भारत शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर संचलित जयक्रांती वरिष्ठ महाविद्यालय यांच्या मराठी विभाग, इतिहास विभाग, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष () आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय परिषदांचे यशस्वी आयोजन करण्यात आले.या परिषदेत ''मराठी २१व्या शतकातील साहित्य : स्वरूप आणि संदर्भ'' तसेच ''इतिहास पर्यटन आणि शाश्वत विकास : संधी आणि आव्हाने'' हे विषय घेण्यात आले होते. उद्घाटन समारंभाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे सचिव प्रा. गोविंदराव घार, उद्घाटक म्हणून प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, सदस्य, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद उपस्थित होते.बीजभाषक म्हणून गोवा विद्यापीठातील मराठी अध्ययनशाखेचे संचालक डॉ. विनय माडगांवकर, तर प्रमुख पाहुणे म्हणून मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर (पुणे) येथील मराठी विभागप्रमुख डॉ. निशा भांडारे उपस्थित होते. तसेच मंचावर प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे, परिषदेचे समन्वयक डॉ. प्रमोद चव्हाण, डॉ. केशव आलगुले, मराठी विभागप्रमुख डॉ. धीरजकुमार कोतमे, आणि डॉ. सतीश डांगे आणि प्रा. शिवराज बाजुळगे आदि. मान्यवर उपस्थित होते. उद्घाटन प्रसंगी प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे म्हणाले, ''चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा आणि परिषदा या माध्यमांतून विविध बुद्धीवादी व्यक्ती एकत्र येतात व विचारमंथन होते. या विचारमंथनातून संशोधकाला नवा आणि सकारात्मक दृष्टिकोन मिळतो. समाजाच्या शाश्वत विकासासाठी हीच प्रक्रिया प्रेरणादायी ठरते. अशा परिषदांमुळे नवनवीन विषय समाजासमोर येतात आणि आव्हानांना सकारात्मकतेने सामोरे जाण्याची दिशा मिळते.'' अध्यक्षीय समारोपात प्रा. गोविंदराव घार म्हणाले, ''विद्यार्थीदशेपासूनच नेतृत्वगुण आणि सकारात्मक चर्चा यांचा अंगीकार झाला, तर समाजातील समस्या संविधानिक मार्गाने सोडविता येतात. या प्रक्रियेतून संशोधनाची प्रेरणा मिळते आणि समाजविकासाची दिशा ठरते. पर्यटनासारख्या क्षेत्रांत शाश्वत विकास आणि रोजगारनिर्मितीच्या



नव्या संधी निर्माण होतात.'' कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रमोद चव्हाण यांनी केले, प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. केशव आलगुले यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ. गीता वाघमारे आणि प्रा. प्रज्ञा कांबळे यांनी केले, तर आभार डॉ. धीरजकुमार कोतमे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. शिवराज बाजुळगे, डॉ. अविनाश पवार, डॉ. राजाभाऊ पवार, डॉ. दिलीप गुंजरगे, डॉ. शरण निलंगेकर, डॉ. रामेश्वर स्वामी, श्री. विजय कनगुले, श्री.रामदास जाधव, अमित भालके, बजरंग चिवडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## १५ ऑक्टोबरपासून राज्यात वादळी पावसाचा अंदाज

### शेतकऱ्यांनी काढणी केलेल्या पिकांना वादळी पाऊस आणि वाऱ्यापासून सुरक्षित ठेवावे

**मुंबई/प्रतिनिधी :** गेल्या काही दिवसांपासून राज्यातील हवामान पूर्णपणे कोरडे आहे आणि नैऋत्य मान्सूनने राज्यातून निरोप घेतला आहे.मात्र १५ ऑक्टोबरपासून राज्यातील हवाम ानात परत एकदा बदल अपेक्षित आहे.या तारखेपासून किमान १८ ऑक्टोबरपर्यंत विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात आभाळी हवामान आणि दुपार नंतरचा वादळी पाऊस अपेक्षित आहे.

सध्याच्या अंदाजानुसार वादळी पावसाची सर्वात अधिक शक्यता आणि प्रमाण हे विदर्भ आणि मराठवाड्यात असू शकतं,जिथे या दरम्यान अनेक भागांमध्ये आभाळी हवामान अथवा वादळी पावसाची शक्यता राहील.तुलनेत खानदेश आणि मध्य महाराष्ट्रात विखुरलेल्या स्वरूपाचा वादळी पाऊस पडू शकतो.

शेतकऱ्यांनी हवामानाच्या या स्थितीनुसार नियोजन करावे आणि काढणी केलेल्या पिकांना वादळी पाऊस आणि वाऱ्यापासून सुरक्षित ठेवावे,असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.

## दयानंद विज्ञान महाविद्यालयात भौतिकशास्त्र आणि इलेक्ट्रॉनिक्स विभागात ऊर्जा संवर्धनावर पोस्टर स्पर्धा



**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद सायन्स कॉलेज,लातूरच्या भौतिकशास्त्र व इलेक्ट्रॉनिक्स विभागांनी ऊर्जा संवर्धन या विषयावर दि.१३ ऑक्टोबर २०२५ या दिवशी पोस्टर स्पर्धेचे आयोजन केले.या स्पर्धेचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये ऊर्जा बचतीबाबत जागरूकता वाढवणे आणि पर्यावरणपूरक उपायांविषयी ज्ञान पसरवणे हा होता.

स्पर्धेत विविध शाखांच्या विद्यार्थ्यांनी सर्जनशील आणि माहितीपूर्ण पोस्टर्स सादर केले,ज्यात अक्षय ऊर्जा,ऊर्जा कार्यक्षमता,पर्यावरण संरक्षण अशा महत्त्वाच्या मुद्द्यांवर प्रकाश टाकण्यात आला.महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे व भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.विजेंद्र चौधरी यांनी सहभागी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक कौतुक केले व त्यांच्या उपक्रमशीलतेचे अभिनंदन केले.या स्पर्धेचे निर्णायक डॉ.दीप्ती ढेरे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले व ऊर्जा संवर्धनाचे महत्त्व सांगितले.विजेत्यांना प्रमाणपत्र देऊन त्यांच्या पुढील प्रयत्नांना प्रोत्साहन दिले गेले. या कार्यक्रमाला डॉ.विश्वनाथ मोटे,डॉ.महादेव पंडगे,डॉ.श्वेता लोखंडे, डॉ.शंकर बिराजदार, प्रा.मंगेश आवाळे,डॉ.लहू काथवटे, प्रा.वैष्णवी चांडक यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची प्रस्तावना कार्यक्रम समन्वयक इलेक्ट्रॉनिक्स विभाग प्रमुख डॉ. टी.एच.मुजावर यांनी केली.या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन,ऊर्जेचे संरक्षण होण्यास निश्चितच मदत झाल्याचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी आपल्या भाषणात नमूद केले.कॉलेज प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या सहभागाचे कौतुक केले आणि असे उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये शाश्वत जीवनशैलीची जाणीव निर्माण करण्यास मदत करतात असे नमूद केले.

## पत्रकार परिषद संपताच संजय राऊतांची प्रकृती बिघडली, तातडीने फोर्टिस रुग्णालयात दाखल

**मुंबई/प्रतिनिधी :** शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. मुंबईतील भांडुप इथल्या फोर्टिज हॉस्पिटलमध्ये संजय राऊत यांना दाखल करण्यात आलं आहे. काही दिवसापूर्वी संजय राऊत यांनी फोर्टिज हॉस्पिटलमध्ये रक्त तपासणी केली होती. सध्या संजय राऊत यांची प्रकृती स्थिर आहे. अस्वस्थ वाटत असल्याने तातडीने फोर्टिज रुग्णालयात दाखल केल्याची माहिती मिळत आहे. सकाळीच संजय राऊत यांनी नेहमीप्रमाणे पत्रकार परिषद घेतली.

या पत्रकार परिषदेत बोलताना संजय राऊतांनी स्वत: राज ठाकरे यांची इच्छा आहे की, आपल्याला महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेल्या काँग्रेसला सुद्धा सोबत घेणे गरजेचे आहे, असं वक्तव्य केलं. संजय राऊतांच्या वक्तव्यानंतर राजकीय वतुर्ळात चर्चांना उधाण आलं आहे. गेल्या काही दिवसांपासून ठाकरे बंधूंचं मनोमिलन झाल्याचं पाहायला मिळत आहे. यामध्ये संजय राऊतांनी मोठी भूमिका बजावली आहे. तसेच, गेल्या कित्येक दिवसांपासून संजय राऊत उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र येण्याबाबत सातत्यानं वक्तव्य करत आहे. तसेच, शिवसेना ठाकरे गटाच्या बाजूनं पक्षाची भूमिकाही प्रभावीपणे मांडत आहेत.

## दयानंद विज्ञानमध्ये सायबर सुरक्षा : काळाची गरज या निबंध स्पर्धेला उस्फूर्त प्रतिसाद



**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.१३ ऑक्टोबर २०२५ रोजी सायबर सुरक्षा : काळाची गरज या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली. ही स्पर्धा घेण्यामागचा मुख्य उद्देश असा की,माहे ऑक्टोबर २०२५ मध्ये सायबर जनजागृती महिना म्हणून राबविण्यात येत आहे. दयानंद शिक्षण संस्था,लातूर व सायबर पोलीस ठाणे,लातूर यांच्यामार्फत संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड,महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या सूचनेनुसार सायबर सुरक्षा संदर्भात विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती व्हावी या उद्देशातून ही स्पर्धा घेण्यात आली.

सदरील स्पर्धेत एकूण २९ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदविला.या स्पर्धेत बी.एस्सी.बी.टी. तृतीय वर्षातील ढवारे पर्णवी प्रधान या विद्यार्थीनीने प्रथम क्रमांक पटकाविला तर औटी गीता संजय या एम.एस्सी. द्वितीय वर्षातील विद्यार्थीनीने द्वितीय क्रमांक मिळविला. प्रथम व द्वितीय येणाऱ्या या यशस्वी विद्यार्थीनींना अनुक्रमे १५००/- रूपये व १०००/- रुपये दिले जाणार आहेत.तसेच यशस्वी विद्यार्थीनींना मा.पोलीस अधीक्षक,लातूर यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे.

स्पर्धा समन्वयक म्हणून डॉ.गजानन बने,डॉ.रामशेट्टी शेटकार यांनी उत्तम नियोजन केले.स्पर्धा मूल्यांकनाचे काम इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.मेघा पंडित यांनी उत्कृष्टरित्या काम पाहिले.या स्पर्धेसाठी ग्रंथपाल प्रा.किरण भिसे,संगणकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.रोहिणी शिंदे व प्रा.वैभव कुलकर्णी यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी सुनील राक्षे, शंकर भालके यांचेही सहकार्य लाभले.

## विशेष मोहीम ५.० अंतर्गत सोलापूर रेल्वे स्थानकावर अमृत संवाद आयोजित




**सोलापूर/प्रतिनिधी :** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने चालू असलेल्या विशेष मोहीम ५.० चा भाग म्हणून सोलापूर रेल्वे स्थानकावर अमृत संवाद कार्यक्रम आयोजित केला होता, ज्याचा उद्देश रेल्वे अधिकारी, प्रवासी आणि भागधारकांमध्ये थेट संवाद वाढवणे हा होता. नागरिकांच्या सहभागासाठी आणि सतत सेवा सुधारण्यासाठी भारतीय रेल्वेच्या वचनबद्धतेशी सुसंगत, अमृत संवाद उपक्रम विभागातील विविध अमृत स्थानकांवर आयोजित केला जात आहे. सोलापूर येथील कार्यक्रमात प्रवाशांचा अनुभव आणि स्थानक सुविधा वाढवण्यासाठी अर्थपूर्ण संवाद साधण्यासाठी प्रवासी, चेंबर ऑफ कॉमर्सचे प्रतिनिधी आणि इतर भागधारकांना एकत्र आणले.

संवादादरम्यान, चर्चा यावर केंद्रित होती:

- अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत केलेल्या सुधारणांचे मूल्यांकन
- चालू विकासात्मक उपक्रमांबद्दल नागरिकांकडून अभिप्राय
- प्रवाशांच्या सोयीसाठी सुधारणा करण्याच्या पुढील क्षेत्रांची ओळख
- भारतीय रेल्वेच्या विकास प्रवासात जनतेच्या सहभागाला प्रोत्साहन
- स्वच्छता आणि स्थानक देखभालीतील प्रवाशांच्या भूमिकेबद्दल जागरूकता वाढवणे

डीआरएम सोलापूर आणि सिनिअर डीसीएम, सिनिअर डीईएन (कॉ), सिनिअर डीईई (जी) आणि एडीईएन (जीएसयू) यांच्यासह इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेतला, भविष्यातील स्थानक सुधारणा प्रयत्नांना मार्गदर्शन करण्यासाठी मौल्यवान अंतर्दृष्टी गोळा केली.

अमृत संवाद, रेल्वे आणि त्याच्या वापरकर्त्यांमधील जोडणारा दुवाम्हणून काम करत होता, पारदर्शकता, समावेशकता आणि नागरिक-केंद्रित उपक्रमांसाठी भारतीय रेल्वेची वचनबद्धता बळकट करत होता. प्रवाशांच्या सुविधा, पायाभूत सुविधा आणि एकूण प्रवास अनुभव सुधारण्यासाठी सोलापूर विभागाची समर्पण देखील यातून दिसून येते.

# गीता परिवार पाथरवाडीच्या आध्यात्मिक पीठास सर्वतोपरी सहकार्य करेल : विठ्ठलानंद महाराज

**लातूर/प्रतिनिधी :** रेणापूर तालुक्यातील पाथरवाडी येथील श्री महादेव आणि हनुमान मंदिर अध्यात्मिक पीठाने एक समाजाभिमुख असा प्रकल्प येथे उभा केला असून समाजातील खऱ्या गरजूंना त्याचा निश्चितपणे लाभ मिळण्यासाठीच्या पूर्ण योजना या पीठाने तयार केल्या आहेत. शासनाने या अध्यात्मिक पीठास ग्रामिण तीर्थक्षेत्राचा क दर्जा दिला आहे. त्यामुळे समाजात या प्रकल्पाचे महत्त्व वाढले आहे. आम्ही स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली मोशी येथे जो वेद विद्यालयाचा प्रकल्प चालवतो, तशाच पद्धतीचं वेदविद्यालय ,संस्कार पीठ आणि मुलांसाठी विविध कौशल्याधारित उपक्रम या ठिकाणी निश्चितपणे सुरू केले जातील. त्यासाठी गीता परिवार अध्यात्मिक



पीठास सर्व प्रकारचे सहकार्य करेल, असे विचार विठ्ठलानंद महाराज यांनी व्यक्त केले.

रविवारी, १२ ऑक्टोबर रोजी विठ्ठलानंद महाराज पुण्याहून अध्यात्मिक पीठास भेट देण्यासाठी आले होते. तेव्हा सर्व भाविक भक्तांच्या मेळाव्यात त्यांनी उपरोक्त विचार व्यक्त केले. त्यांच्या कार्यक्रमापूर्वी लातूर येथील शारदा सदन या शाळेत संस्कृतचे अध्यापन करणाऱ्या सृष्टी आर्या यांच्या मार्गदर्शनाखाली त्या ठिकाणी होम हवन करण्यात आले. तेथील जुन्या सभागृहाचे नूतनीकरण केले असून त्या सभागृहाचा लोकार्पण सोहळा होम हवनाने झाला. सृष्टी आर्या यांनी अतिशय अभ्यासपूर्ण अशा प्रकारचे या यज्ञाचे संचालन केले आणि उपस्थित सर्व स्त्रोत्रवर्ग मंत्रमुग्ध झाला. यानंतर जो प्रगट कार्यक्रम झाला, त्या कार्यक्रमासाठी पुणे येथून ह.भ.प. शिवाजी महाराज नवल आणि ह.भ.प. ढगे महाराज यांची विशेष उपस्थिती होती. याप्रसंगी नवल महाराजांचे गीतेच्या अध्यायावर प्रवचन झाले .समाजातील निराधार अशा ज्येष्ठ महिलांना साड्या आणि पुरुषांना ब्लँकेटचे वाटप विठ्ठलानंद महाराज यांच्या हस्ते करण्यात आले.

आपल्या प्रवचनात विठ्ठलानंद महाराजांनी या प्रकल्पाची स्तुती करून अल्पावधीत या प्रकल्पाने सामान्यांच्या मनात आदराची, समर्पणाची भावना निर्माण करण्याचे महत्वपूर्ण कार्य केल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमासाठी पाथरवाडी परिसरातील आणि लातूरहून आलेले नागरिक बंधू-भगिनी अशी २०० व्यक्तींची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विलास आराध्ये गुरुजी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नवनाथ मद्दे, रमेश मद्दे, बब्रुवान खंदाडे, सर्वोत्तम कुलकर्णी, शंकर घोलप, गोरख साळुंके यासह अनेकांनी परिश्रम घेतले. श्री महादेव आणि श्री हनुमान जी यांच्या महाआरतीनंतर सर्वांनी महाप्रसाद घेतला आणि कार्यक्रमाची सांगता झाली.

## मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील डॉ. कोटनीस मेमोरियल रेल्वे हॉस्पिटलमध्ये जागतिक मानसिक आरोग्य दिन साजरा

**सोलापूर/प्रतिनिधी :** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील सोलापूर येथील डॉ. कोटनीस मेमोरियल डिव्हिजनल रेल्वे हॉस्पिटलने जागतिक मानसिक आरोग्य दिन मोठ्या उत्साहात तसेच मानसिक आरोग्य आणि तणावमुक्त कामाच्या ठिकाणी प्रोत्साहन देण्यासाठी वचनबद्धतेने साजरा केला.



कामाच्या ठिकाणी मानसिक आरोग्य आणि ताण व्यवस्थापनाबद्दल जागरूकता पसरवण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. क्लिनिकल सायकॉलॉजिस्ट आणि अतिथी व्याख्याता श्रीमती श्रेया गारमपट्टी यांनी कामाच्या ठिकाणी ताण व्यवस्थापनावर एक महत्वपूर्ण आणि अंतर्दृष्टीपूर्ण व्याख्यान दिले. त्यांनी दैनंदिन ताणतणावांना तोंड देण्यासाठी व्यावहारिक तंत्रे सांगितली आणि निरोगी काम-जीवन संतुलन राखण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

मुख्य वैद्यकीय अधीक्षक (सीएमएस) डॉ. मंजुनाथ यांनी मेळाव्याला संबोधित केले, तणाव प्रभावीपणे व्यवस्थापित करण्यासाठी आत्मबळ, मुक्त संवाद आणि सक्रिय ऐकणे यांची महत्त्वाची भूमिका अधोरेखित केली. मानसिक आरोग्याला प्रोत्साहन देण्यासाठी पौष्टिक आहार, नियमित व्यायाम आणि संगीत थेरपीचा समावेश असलेली संतुलित जीवनशैली स्वीकारण्याचे महत्त्वही त्यांनी अधोरेखित केले.

या सत्रात डॉक्टर, फार्मासिस्ट, नर्सिंग कर्मचारी, रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक अशा १०० हून अधिक उपस्थितांचा उत्साही सहभाग होता. संवादात्मक चर्चा आणि तज्ञांच्या अंतर्दृष्टींना चांगला प्रतिसाद मिळाला, ज्यामुळे हा कार्यक्रम माहितीपूर्ण आणि प्रभावी ठरला.

विभागीय वैद्यकीय अधिकारी (डीएमओ) डॉ. विनोद यांच्या सहकार्याने आणि मुख्य नर्सिंग पर्यवेक्षक (सीएनएस) श्री राहुल गंबारे, सहाय्यक नर्सिंग अधिकारी (एएनओ) श्रीमती साखरे यांच्या कार्यक्षमतेने समन्वय साधून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आणि त्याची सुरळीत अंमलबजावणी सुनिश्र्चित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

डॉ. कोटनीस मेमोरियल रेल्वे रुग्णालयात जागतिक मानसिक आरोग्य दिन साजरा करण्यात आला आणि त्यातून हा संदेश मिळाला की मानसिक आरोग्य हे शारीरिक आरोग्याइतकेच महत्त्वाचे आहे. सोलापूर विभाग समग्र कल्याणावर भर देत आहे.


प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# पंचायत समिती सभापती पद आणि जिल्हा परिषद निवडणूक विभागाचे आरक्षण जाहीर






**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील सर्व पंचायत समिती सभापती, जिल्हा परिषद सदस्य पदाच्या आरक्षण निश्चितीसाठी आज जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात आरक्षण सोडतीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, सामान्य प्रशासनचे उपजिल्हाधिकारी गणेश पवार यांच्यासह अधिकारी, कर्मचारी व नागरिक यावेळी उपस्थित होते.

लातूर जिल्ह्यातील पंचायत समि त्यांच्या सभापती आरक्षण सोडतीमध्ये निलंगा पंचायत समितीचे सभापती पद अनुसूचित जाती (महिला), औसा पंचायत समितीचे सभापती पद अनुसूचित जाती, उदगीर आणि चाकूर पंचायत समितीचे सभापती पद नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला), लातूर पंचायत समितीचे सभापती पद नागरिकांचा मागास प्रवर्ग, जळकोट आणि रेणापूर पंचायत समितीचे सभापती पद सर्वसाधारण (महिला), देवणी, अहमदपूर, शिरूर अनंतपाळ पंचायत समितीचे सभापती पद सर्वसाधारण प्रवर्गासाठी आरक्षित झाले आहे.

## या सोडतीमध्ये जिल्हा परिषद निवडणूक विभागांचे आरक्षण खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आले

### अहमदपूर तालुक्यातील जिल्हा परिषद निवडणूक विभाग

- खंडाळी- नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)
- हाडोळती - सर्वसाधारण
- शिरुर ताजबंद- अनुसूचित जाती
- अंधोरी- सर्वसाधारण
- किनगाव- नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)
- सावरगाव रोकडा - अनुसूचित जमाती

### जळकोट तालुक्यातील जिल्हा परिषद निवडणूक विभाग

- वांजरवाडा- सर्वसाधारण
- माळहिप्परगा- सर्वसाधारण (महिला)
- गुत्ती- अनुसूचित जाती (महिला)

### उदगीर तालुक्यातील जिल्हा परिषद निवडणूक विभाग

- वाढवणा बु.- नागरिकांचा मागास प्रवर्ग
- सोमनाथपूर- अनुसूचित जाती (महिला)
- नळगीर - अनुसूचित जाती (महिला)
- निडेबन - अनुसूचित जाती
- लोहारा - अनुसूचित जाती
- हेर- अनुसूचित जाती
- तोगरी- सर्वसाधारण

### देवणी तालुक्यातील जिल्हा परिषद निवडणूक विभाग

- बोरोळ - नागरिकांचा मागास प्रवर्ग
- वलांडी - सर्वसाधारण (महिला)
- जवळगा- सर्वसाधारण

### शि. अनंतपाळ तालुक्यातील जिल्हा परिषद निवडणूक विभाग

- येरोळ - अनुसूचित जाती (महिला)
- साकोळ - अनुसूचित जाती

### चाकूर तालुक्यातील जिल्हा परिषद निवडणूक विभाग

- जानवळ- नागरिकांचा मागास प्रवर्ग
- चापोली- नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)
- रोहिणा - अनुसूचित जाती (महिला)
- वडवळ (ना.)- नागरिकांचा मागास प्रवर्ग
- नळेगाव- सर्वसाधारण

### रेणापूर तालुक्यातील जिल्हा परिषद निवडणूक विभाग

- पानगाव - नागरिकांचा मागास प्रवर्ग
- खरोळा - सर्वसाधारण (महिला)
- कामखेडा - सर्वसाधारण (महिला)
- पोहरेगाव - सर्वसाधारण (महिला)

### लातूर तालुक्यातील जिल्हा परिषद निवडणूक

- आर्वी- सर्वसाधारण (महिला)
- भातांगळी- नागरिकांचा मागास प्रवर्ग
- महाराणा प्रतापनगर- अनुसूचित जाती
- पाखरसांगवी- नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)
- हरंगुळ बु. - सर्वसाधारण (महिला)
- काटगाव - सर्वसाधारण (महिला),
- तांदुळजा - नागरिकांचा मागास प्रवर्ग
- मुरुड बु.- नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)
- निवळी- अनुसूचित जाती (महिला)
- एकुर्गा- सर्वसाधारण



### औसा तालुक्यातील जिल्हा परिषद निवडणूक

- लोदगा - सर्वसाधारण (महिला)
- आलमला - नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)
- खरोसा - सर्वसाधारण
- लामजना - नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)
- भादा - नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)
- उजनी - सर्वसाधारण
- आशिव - सर्वसाधारण (महिला)
- मातोळा - सर्वसाधारण (महिला)
- किल्लारी - सर्वसाधारण

### निलंगा तालुक्यातील जिल्हा परिषद निवडणूक

- निटूर - सर्वसाधारण
- अंबुलगा बु. - सर्वसाधारण
- लांबोटा - सर्वसाधारण (महिला)
- दापका - सर्वसाधारण
- हलगरा - सर्वसाधारण
- औराद (शहा.) - सर्वसाधारण (महिला)
- मदनसुरी - सर्वसाधारण (महिला)
- सरवडी - सर्वसाधारण (महिला)
- कासार शिरसी - सर्वसाधारण,
- तांबाळा - अनुसूचित जमाती (महिला)

# अतिवृष्टीमुळे उस उत्पादक शेतकऱ्यांना उस तोडणीसाठी अडचणी

## साखर कारखान्यानी नोव्हेंबर मध्ये तोडणी करावी ; उस उत्पादक शेतकऱ्यांची मागणी

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यात मोठ्या प्रमानात अतिवृष्टी झाल्याने शेतात अजूनही मोठ्या प्रमाणात पाणी असल्याने शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात अडचणींना सामोरे जात असताना जिल्ह्यातील नगदी पीक असलेले उस गाळप लवकर सुरू होणार आहे आगामी गळीत हंगामात उस तोडणीसाठी मोठी कसरत करावी लागणार असून अनेक ठिकाणी उस आडवे पडलेले आहेत तर अनेक ठिकाणी जायलाच रस्ता राहिलेला नाही तसेच अतीवृष्टी झाल्याने उसाचे वजन वाढलेले नाही त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसू शकतो सध्या थंडी अजून सुरू नाही त्यामुळें उसाची तोडणी नोव्हेंबर मध्ये करावी त्यामुळें उसाचे वजन वाढेल शेतकऱ्यांना आर्थिक दृष्ट्या अधिक मदत होईलअशी मागणी उस उत्पादक शेतकऱ्यांकडून होत आहे

जिल्ह्यात उसाचे क्षेत्र मोठया प्रमाणावर असून यावेळी मोठया प्रमाणावर अतिवृष्टीचा फटका जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना बसलेला आहे जवळपास ७५ टक्के पीकाचे नुकसान झालेले असून उस, सोयाबीन पिकांना मोठा फटका या अतिवृष्टी पावसामुळे झालेला आहे त्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे एकीकडे शेतकऱ्यांना सरकारकडून अद्यापही मदत मिळालेली नसताना उसाचे क्षेत्र मोठया प्रमाणावर असून अनेकांचा उस अजूनही पाण्यात उभा आहे तर अनेकांचे उसाच्या फडात जायला रस्ताच शिल्लक राहिलेला नाही यासाठी साखर कारखान्यानी ऊसाचे गाळप नोव्हेंबर मध्ये सुरू करावे जेणेकरून उस उत्पादक शेतकऱ्यांना उस तोडणी पर्यंत उसाचे टनेज वाढेल तो पर्यंत थंडी सुरू होईल शेतकऱ्याच्या उसाचे वजन वाढल्याने चार पैसे जास्त मिळतील अशी अपेक्षा आहे अशी मागणी जिल्ह्यातील उस उत्पादक शेतकऱ्यांची आहे




निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396


### स्नेह भोजन...

स्नेह संबंधा वाढवा
चालले स्नेहभोजन
सर्व पक्षा पक्षांमध्ये
सहवेदन आयोजन

यजमान महत्वाचा
जोरदार रे नियोजन
आतले झोडीपाट्यी
जरी उपाशीबहुजन

वास राजकारणाचा
आधी हो दंत मंजन
तर्क वितर्क लढवत
मजेतकरे मनोरंजन

पोटशूळ उफाळला
काहींचे स्वप्न भंजन
राज्यां मधल्या प्रश्नां
दिल्लीतऑक्सिजन

सामील हो इतरेजन
सोडून जाती स्वजन
पंगतीत ना भेदाभेद
कोण दुर्जन सज्जन


साध्या व्याधी साठी
दिल्ली मधले सर्जन
पुनर् पक्षीय बांधणी
घडाय लागले सृजन

पाही सगळे मतदार
डोळ्यांघाली अंजन
सत्तेत बसवे भल्या
इतरांचे हो विसर्जन

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

# मूलभूत सुविधा योजने अंतर्गत २३ गावातील विविध कामासाठी आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून अडीच कोटीचा निधी मंजूर

**लातूर/प्रतिनिधी :** ग्रामीण भागातील गावांतर्गत मूलभूत सुविधा पुरविणे (२५१५) या योजनेअंतर्गत भाजपाचे नेते आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील २३ गावातील विविध विकास कामासाठी अडीच कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.



लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील विविध गावातील नागरिकांना मूलभूत सोयी सुविधा मिळाव्यात यासाठी राज्याचे ग्रामविकास मंत्री ना. जयकुमारजी गोरे यांच्याकडे भाजप नेते आ रमेशआप्पा कराड यांनी मूलभूत सुविधांच्या कामासाठी निधी मिळावा याकरिता वेळोवेळी पाठपुरावा केला. आ. रमेशआप्पा कराड यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे लातूर ग्रामीण मतदार संघातील २३ गावाअंतर्गत मूलभूत सुविधेच्या विविध कामासाठी तब्बल अडीच कोटी रुपयांचा निधी राज्याच्या ग्रामविकास विभागाने १३ ऑक्टोबर २०२५ रोजी च्या शासन निर्णयानुसार मंजुरी दिली आहे.

मूलभूत सुविधा (२५१५) योजनेअंतर्गत शासनाने मंजूर केलेल्या लातूर ग्रामीण मतदार संघातील २३ गावात लातूर तालुक्यातील १० रेणापूर तालुक्यातील ०९ आणि भादा सर्कल मधील ०४ गावाचा समावेश आहे. त्यात लातूर तालुका बोरी १० लक्ष, बोकनगाव १० लक्ष, साखरा १० लक्ष, शिऊर १० लक्ष, काटगाव १० लक्ष, गाधवड १० लक्ष, चिंचोली ब. १० लक्ष, तांदूळजा १० लक्ष, शिराळा १० लक्ष, सलगरा बु. २० लक्ष, रेणापूर तालुक्यातील गोढाळा २५ लक्ष, भंडारवाडी १० लक्ष, धवेली १० लक्ष, दर्जीबोरगाव १० लक्ष, डिगोळ देशमुख १० लक्ष, चुकारवाडी १० लक्ष, कोळगाव ७ लक्ष, यशवंतवाडी १० लक्ष, कामखेडा १० लक्ष, आणि भादा सर्कल मधील टाका १० लक्ष, शिवली ९ लक्ष, समंदर्गा १० लक्ष, भादा ९ लक्ष याप्रमाणे एकूण अडीच कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. मंजूर निधीतून गावांतर्गत ग्रामपंचायत बांधकाम, सभामंडप बांधकाम, पेव्हर ब्लॉक रस्ता, सिमेंट रस्ता, पत्र्याचे शेड बांधकाम, गावांतर्गत रस्ता, नाली व पूल बांधकाम, यासह विविध गावांतर्गत मूलभूत सुविधा पुरविणारे कामे केली जाणार आहेत.

भाजपाचे नेते आमदार रमेशआप्पा कराड यांनी मूलभूत सुविधा योजनेअंतर्गत २३ गावातील विविध विकास कामासाठी निधी मिळवून दिल्याबद्दल त्यांचे त्या त्या गावातील भाजपाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आभार व्यक्त केले आहेत.


टोनर रिफिलिंग
फक्त ₹ ३००/-
मास्टर प्लेट
ड्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग


# ज्ञानप्रकाश शैक्षणिक प्रकल्पातील राज्यस्तरीय मल्लखांब व रोप मल्लखांब, रायफल शूटिंग विभागीय स्पर्धेसाठी २४ खेळाडूंची पात्र

**लातूर/प्रतिनिधी :** ज्ञानप्रकाश शैक्षणिक प्रकल्प,लातूर गुणवत्तापूर्ण शिक्षणासह कला,क्रीडा,सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी ओळखला जातो. लातूर शहरातील विविध संगीत स्पर्धेत यावर्षी ज्ञानप्रकाश शैक्षणिक प्रकल्पाच्या समूहाने प्रथम क्रमांक मिळविला आहे. तसेच शारीरिक व मानसिक सक्षमता निर्माण व्हावी प्रकल्पात जाणीवपूर्वक खेळाला प्राधान्य दिले जाते.

परिणामी वेगवेगळ्या क्रीडा प्रकारात ज्ञानप्रकाश शैक्षणिक प्रकल्पाच्या खेळाडूंनी आपले प्राविण्य मिळविले आहे.

त्यात मल्लखांब व रोप मल्लखांब विभागीय स्पर्धेत इयत्ता ९ वी कु. अपूर्वा विष्णू चव्हाण तर रायफल शूटिंग स्पर्धेत इयत्ता ८ वी तील भार्गव कणकधर याने विशेष कौशल्य दाखवत नागपूर येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी त्याची निवड झाली.तर खालील खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

कॅरम



२) अर्णव अशोक गुरदाळे (६ वी)
प्रथम

मल्लखांब
३) समृद्धी प्रताप भांदरगे
४) सिध्दी शकर पांचाळ
५) अपूर्वा विष्णू चव्हाण
६) वैदेही वसंत पाटील
७) श्रीकृष्ण गोपाळ सूर्यवंशी
८) अभिषेक भागवत नरारे

बॅडमिंटन
९) शुभ्रा गिरीष कुलकर्णी (७वी)
प्रथम

स्विमिंग
१०) हर्ष रविंद्र अपसिंगे(१० वी) १०० मीटर... प्रथम
११) श्रवण शिवदास शिंदे (१० वी) १००मीटर ...द्वितीय
१२) गणेश शिवराम क्षिरसागर (८वी) ५० मीटर... द्वितीय

जिम्नास्टिक
१३) राजलक्ष्मी पवन लड्डा (६वी)

बॅडमिंटन
१७ वर्षाखालील मुले:- सांघिक बॅडमिंटन संघामध्ये ज्ञानप्रकाशच्या संघाचा तृतीय क्रमांक आला.
१४)अखिलेश माने
१५) सोहम रेड्डी
१६) आदर्श राठोड
१७) फरहान शेख
१८) समर्थ लखोटे.

मॉडर्न पॅथेलॉन
१९) श्रवण शिंदे

स्कॉश
२०) अखिलेश माने

कराटे
२१) मधुरा भोसले
२२) सायली महाबोले
२३) कुशल कटारे

किक बॉक्सिंग
२४) अक्षरा भुजबळ

वरील यशस्वी विद्यार्थ्यांचे ज्ञानप्रकाश प्रकल्पाचे प्रकल्प सतीश नरहरे, केंद्राचा संचालिका व मुख्याध्यापिका सविता नरहरे, पर्यवेक्षक अशोक गुरदाळे, प्रशिक्षक प्रकाश टिमके व शिक्षक प्रशांत शिंदे यांनी अभिनंदन केले.


Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६